नोंदणी क्रं. एफ.१६०९४(मुंबई)

महाराष्ट्र शासन
मराठी भाषा विभाग
राज्य मराठी विकास संस्था
एल्फिन्स्टन तांत्रिक विद्यालय, ३, महापालिका मार्ग,
धोबीतलाव, मुंबई - ४००००१ दूरध्वनी : (०२२) २२६३१३२५ / २२६५३९६६
संकेतस्थळ https://rmvs.marathi.gov.in इ-पत्ता rmvs_mumbai@yahoo.com

निवेदन

महाराष्ट्र राज्याचे सांस्कृतिक धोरण २०१० अंतर्गत मराठी भाषेतील प्रतिमुद्राधिकाराची (कॉपीराइटची) मुदत संपलेले दुर्मिळ ग्रंथ महाजालावर उपलब्ध करून द्यावे असे म्हटले आहे. त्यानुसार मराठी भाषा विभागाच्या आदेशाप्रमाणे (शासननिर्णय क्र. रासांधो १०१२/ प्र. क./२०१२/भाषा-३ दि. २८ मार्च २०१३) राज्य मराठी विकास संस्थेद्वारे असे ग्रंथ आणि नियतकालिके महाजालावर उपलब्ध करून देण्याचा प्रकल्प राबवण्यात येत आहे. त्याच बरोबर प्रतिमुद्राधिकाराच्या कक्षेत येणारी काही साधनेही प्रतिमुद्राधिकारधारकांची उचित अनुमती प्राप्त झाल्यास संस्थेद्वारे संगणकीकृत करून अभ्यासकांसाठी उपलब्ध करून देण्यात येत असतात.

सदर प्रकल्पांतर्गत **विदर्भ साहित्य संघ, नागपूर** ह्या संस्थेद्वारे प्रकाशित करण्यात येणाऱ्या **युगवाणी** ह्या नियतकालिकाच्या अंकांचे संगणकीकरण करून ते सार्वजनिकरीत्या आणि विनामूल्य उपलब्ध करून देण्यासंदर्भात उपरोक्त संस्थेला आवाहनपर विनंती करण्यात आली होती.

सदर विनंती मान्य करून विदर्भ साहित्य संघाद्वारे सदर अंक संगणकीकरणासाठी उपलब्ध करून देण्यात आले. हे अंक सदर संस्थेच्या सहकार्यामुळेच आपल्याला संगणकीय स्वरूपात उपलब्ध होत आहेत.

या अंकांच्या पीडीएफ प्रती आपण विनामूल्य उतरवून घेऊ शकता. असे करताना खालील सूचना लक्षात घेऊन त्यांचे पालन करावे.

१. सदर ग्रंथांच्या पीडीएफ प्रती या वैयक्तिक वापरासाठी विनामूल्य उतरवून घेता येतील तसेच इतरांनाही विनामूल्य देता येतील. पण कोणत्याही कारणासाठी त्याचा व्यावसायिक वापर करता येणार नाही.
२. सदर ग्रंथांचे दुवे इतरांना देताना त्यासाठी कोणतीही रक्कम आकारता येणार नाही.
३. पीडीएफ प्रतींवर असलेली राज्य मराठी विकास संस्था, मुंबई व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांची मुद्रा आपणास काढता येणार नाही.
४. आपल्या अभ्यासासाठी, संशोधनासाठी या सामग्रीचा उपयोग करताना आपण योग्य तो श्रेयनिर्देश केला पाहिजे.

वरील अटींचा भंग झालेला आढळल्यास कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

स्पष्टीकरण : सदर सामग्री ही केवळ ऐतिहासिक दस्तऐवज म्हणून उपलब्ध करण्यात आली असून या सामग्रीतून व्यक्त होणारी मते, विचारसरणी इ. त्या त्या लेखक, संपादक इ. कर्त्यांची आहे. त्यांपैकी कोणतेही मत, विचारसरणी इ. यांचा पुरस्कार महाराष्ट्र शासन, मराठी भाषा विभाग, राज्य मराठी विकास संस्था व विदर्भ साहित्य संघ, नागपूर यांपैकी कुणीही करत नसून त्या त्या मताचे वा विचारसरणीचे दायित्व उपरोक्त विभागांवर/ संस्थांवर असणार नाही.

सदर अंक केवळ अभ्यासकांच्या सोयीसाठी संगणकीय स्वरूपात उपलब्ध करण्यात येत असून अंकांतील सामग्रीचे (लेखन, मांडणी, छायाचित्रे, रेखाचित्रे इ.) प्रतिमुद्राधिकार त्या त्या लेखकांकडे अथवा प्रकाशकांनी त्या त्या वेळी केलेल्या व्यवस्थेनुसार आहेत ह्याची नोंद घेण्यात यावी. त्या सामग्रीसंदर्भातील कोणतेही अधिकार वा दायित्वे राज्य मराठी विकास संस्था, मराठी भाषा विभाग किंवा महाराष्ट्र शासन ह्यांच्याकडे असणार नाहीत.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत

मराठीचा विकास : महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

७

वि. वा. करंबेळकर
द. चिं. सोमण
वसंत निनावे
मधु वाबगावकर
उ. रा. गिरी
श्रीपाद गंगाधर कावळे
वसंत वऱ्हाडपांडे
मनोहर प्रभाकर
मा. ल. व्यवहारे
श्री. भा. वर्णेकर
क्ष
श्री. स. पेंढारकर
भ. श्री. पंडित
पां. कृ. सावळापूरकर
अ. ना. देशपांडे
पां. ब. गाडगीळ
भा. गो. जामदार
या शिवाय
आम्रमहिमा, संघवार्ता इत्यादि

विदर्भ साहित्य संघ, नागपूर
ग्रंथ संग्रह

वें अंक चवथा किंमत आठ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत. १९२३
विदर्भ साहित्य संघ

संपादक मंडळ :

प्रो. ह. ना. नेने
प्रा. के. ज. पुरोहित
प्रो. गो. रा. दोडके
श्री. शरच्चंद्र मुक्तिबोध
प्रा. अ. ना. देशपांडे

संपादक :

प्रो. पुरुषोत्तम दिवाकर ढवळे

पत्रव्यवहाराचा पत्ता :

"युगवाणी" कार्यालय,
विदर्भ साहित्य संघ
उत्तर अंबाझरी रस्ता,
नागपूर १.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

यु ग वा णी

वर्ष ८ वें जुलै १९५३ अंक ४ था

सं पा द की य

थोडेसें आत्मनिरीक्षण

युगवाणीचा दर्जा आणखी सुधारावा अशी इच्छा आजकाल विदर्भ साहित्य संघाच्या अनेक सदस्यांकडून व्यक्त होत असते; तो तसा सुधारेल अशी खात्रीहि कांही लोकांना वाटूं लागली आहे. सर्वांच्या इच्छांना प्रयत्नांचें पाठबळ मिळालें तर हें काम सहज होईल व तशीं सुचिन्हेंहि दिसूं लागलीं आहेत. या बाबतींत कांही अडचणी आहेत; त्यांची जाणीव प्रगतीसाठी अवश्य आहे.

कांही वाचकांना युगवाणी अतिशय 'जड' वाटते तर कांहीना ती फर 'हलकी' वाटते. हीं दोन टोकें जोडावीं लागतील. त्यांत समाधानाबरोबर असमाधानहि यायचेंच. कित्येकांच्या खिशांत युगवाणीच्या हिताच्या योजना आहेत. या योजना स्वागतार्ह आहेत. पण त्यांच्या बरोबर आवश्यक तें लेखनसहकार्य हुकमी यावयास हवें. असें लिखाण करण्याचें कसब संघाच्या सदस्यांजवळ खचित् आहे; त्याचा युगवाणीस सढळ हाताने उपयोग व्हावयास हवा. युगवाणीचा व्यापार साहित्यिक आणि सांस्कृतिक आहे; बाजारु नाही इकडेहि लक्ष असावयास हवें. सर्व तऱ्हेची विविध अभिरुचि सांभाळण्याचें काम जितकें आनंददायी तितकेंच व्यावहारिक दृष्ट्या बिकट आहे. त्यांत युगवाणीची पृष्ठसंख्या नडते. पृष्ठसंख्या कमी वाटली तर ती वाढवावी हें झालें सरळ उत्तर. पण आहे त्या पृष्ठसंख्येंत युगवाणीचा जमाखर्च बसत नाही. युगवाणीचे वाचक व संघाचे सभासद वाढत आहेत आणि वाढतील यांत शंका नाही. पण युगवाणीचें वार्षिक शुल्क इतकें उदार आहे की वाढते वाचक आणि सभासद युगवाणीच्या आर्थिक ओढाताणींत नकळत भर घालतील की काय अशी भीति वाटते. युगवाणीच्या हितचिंतकांनी याहि बाबतींत विचार केला पाहिजे. या बाबतींत विचार आणि आचार हें सर्वांचें काम आहे. या बाबतींत आम्ही प्रयत्न करीत आहोंतच. युगवाणीचा आकार वाढला आहे हें वाचकांच्या लक्षांत येईलच. युगवाणीचे वाचक तिच्या आर्थिक व साहित्यिक सुधारणेचे उपाय आम्हांला कळवतील तर आम्ही ऋणी होऊं.

विज्ञान—महाविद्यालयांतील मराठीचें शिक्षण

सत्यकथा मासिकाने कांही महिन्यांपूर्वी एक महत्वाचा प्रश्न उपस्थित केला आहे. महाराष्ट्रांतील इतर नियतकालिकांनीहि त्या प्रश्नाकडे थोडेंफार लक्ष दिलें आहे आणि अधिक द्यावयास हवें. महाराष्ट्रांतील निरनिराळ्या विज्ञानमहाविद्यालयांत—मुख्यत: सरकारी महाविद्यालयांत—मराठीच्या शिक्षणाला जो सापत्नभाव दाखविण्यांत येत आहे तो खरोखरच खेदजनक आहे.

इंटरच्या परीक्षेला बसणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्याला मातृभाषेचा एक पेपर असतो. निबंधलेखन व तत्सम गोष्टी एवढेच विषय या पेपरमध्ये येत असले तरी तो एक अनिवार्य पेपर आहे. इतर विषयांत पहिल्या वर्गाचे गुण मिळूनहि या एका पेपरमुळे सबंध परीक्षेंत नापास झालेल्या विद्यार्थ्यांचींहि उदाहरणें अधून मधून ऐकूं येतात. मातृभाषेला दिलेलें हें महत्व उचितच आहे. सर्व शिक्षण मातृभाषेंतून देण्याचे प्रयत्न चालू असतां तर या पेपरला विशेषच महत्व आहे. इतकें असूनहि या विषयांत अध्यापनाची नियमित सोय सरकार करीत नाही. ज्याची मातृभाषा मराठी आहे किंवा फार तर ज्याने बी. ए. ला मराठी विषय घेतला होता अशा एखाद्या विज्ञानाच्या अथवा इंग्रजीच्या प्राध्यापकावर या विषयाची जबाबदारी ढकलण्यांत येते. या बाबतींत विश्वविद्यालयाच्या नियमांचा दाखला देऊन सरकार जबाबदारी झटकण्याची शिताफी करूं शकेल. पण

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विषयाचें महत्व व महाविद्यालयीन अभ्यासक्रमाचा दर्जा लक्षांत घेऊन सरकारने या बाबतींत नियमित सोय केली पाहिजे. दोन विषयांत अध्यापन–प्राविण्य असलेला प्राध्यापक एखादे वेळीं सापडूं शकेल पण सामान्यत: भाषेच्या शिक्षणांत ‘ दोन घोड्यांवरील स्वारी ’ जमत नाही; फार तर सर्कस म्हणून तिचें एखादे वेळीं कौतुक करतां येईल. परंतु नियमित व्यवस्था म्हणून तिचा उपयोग नाही हें तत्व सर्वांना–सरकारला देखील सहजच मान्य व्हावें.

सावरकर दीर्घायु होवोत

मेच्या २८ तारखेला सावरकरांनी आपल्या जीवनाच्या एकाहत्तराव्या वर्षात पदार्पण केलें. सावरकर ही व्यक्ति जेव्हा भारताच्या राजकीय क्षेत्रांत चमकली तेव्हापासून तर आजतागायत त्या व्यक्तीविषयींचें कुतूहल भारतीय मनांत कायम आहे. त्यांचें काव्य, त्यांचें ‘ माझी जन्मठेप ’, त्यांचें ‘ काळें पाणी ’, आणि त्यांच्या आत्मचरित्राचा प्रसिद्ध झालेला एक भाग यांच्या योगानें त्यांच्या लौकिक आणि आत्मिक जीवनाची थोडीबहुत ओळख त्यांच्या चाहत्यांना, वाचकांना होऊं शकली. परंतु सावरकर ही व्यक्ति तिच्या साहित्याहून थोर आहे. आणि आजहि अनुभवाचें संचित त्यांच्याजवळ इतकें मोठें आहे की त्यांच्या आत्मचरित्राचे चारपांच खंड अजून प्रकट होऊं शकतील. परराष्ट्रांत त्यांनी उभारलेल्या राष्ट्र-स्वातंत्र्याच्या चळवळीचा केवढा तरी इतिहास अज्ञात आहे. चारसाडेचारशें पानांचें चरित्र लिहिणाऱ्या करंदीकरांना अनेक बाबतींत ‘ स्वत: सावरकरच या गोष्टी सांगूं शकतील ’ असें लिहावें लागलें. या गोष्टी समजून घेण्याची गोडी सगळ्यांनाच आहे. हें कार्य पूर्णांशाने त्यांच्याकडून पार पडो, व साहित्यिकांना लेखण्या सोडून तरवार हातीं घेण्यास सांगणाऱ्या या वाग्भटास उदंड दीर्घायुरारोग्य लाभो हीच सर्व साहित्य-प्रेमिकांची आंतरिक प्रार्थना असणार.

नभोवाणी व संगीत कलावंत

डॉ. बाळकृष्ण केसकर हे मोठे उत्साही व ध्येयवादी मंत्री आहेत. नभोवाणीचा कारभार त्यांच्याकडे येतांच नभोवाणीवरील संगीताचा दर्जा वाढविण्याची मोहीम त्यांनी जोपांत सुरू केली. त्यांच्या या उत्साहाचे कांही तरी चांगले परिणाम व्हावेत अशीच कुणाहि कलाप्रेमी व्यक्तीची इच्छा असणार. पण सध्या तरी डॉ. केसकरांच्या धोरणामुळे वाद–प्रतिवादालाच भरती आली आहे.

चित्रपट–संगीतविषयक त्यांचें धोरण त्या धंद्याशीं संबंधित असणाऱ्या व्यक्तींना पटूं नये हें साहजिकच आहे. परंतु एकंदर जनताहि फारशी खूष नाही. अखिल भारतीय नभोवाणीपेक्षा सामान्य श्रोत्यांचे कान सध्या पाकिस्तान, सिलोन, गोवा इत्यादि परदेशी केंद्रांकडेच अधिक वळले आहेत. या घटनेकडे नभोवाणीखात्यानें काळजीपूर्वक लक्ष द्यायला हवें. याहूनहि गंभीर घटना म्हणजे नभोवाणीनें नेमलेलें संगीत–परीक्षा मंडळ व शास्त्रीय गायक यांतील मतभेद. या मतभेदांचें स्वरूप उग्र होत चाललें असून कलावंतांनी निरोधनाचाहि अवलंब केला आहे. या कलावंत मंडळींतील बडे गुलाम अली खान, मोगुबाई कुर्डीकर, अमीरखान इत्यादि नामवंत नांवें पहातांच कलावंतांच्या भूमिकेसंबंधी बूज वाटूं लागते. निरनिराळ्या कलावंतांची चाचणी घेऊन त्यांची वर्गवारी करणें ही प्रथाच या कलावंतांना पसंत नाही.

नभोवाणी खात्यानें या मतभेदासंबंधी जो खुलासा केला तो फारसा पटणारा नाहीं. नभोवाणीच्या कारभारांतील वशिलेबाजी काढून टाकून संगीताचा दर्जा सुधरवला पाहिजे या बाबतींत वाद नाही. पण त्यासाठी नभोवाणीनें स्वीकारलेली पद्धति असावी तितकी निर्दोष नाही. परीक्षा–समिति नेमतांना त्या खात्यानें संगीताच्या निरनिराळ्या परंपरांतील तज्ज्ञांचा सल्ला घेतला होता किंवा नाही हें कळावयास मार्ग नाही. प्रथितयश गायकांना या परीक्षेचा जाच कितपत होतो हें नीट कळत नाही. चाचणीचें हें काम एखाद्या नोकरीच्या चाचणीसारखें होऊं नये. बहुतेक कलावंतांना प्रत्यक्ष परीक्षेला न बोलावतांहि त्यांचें कसब घरीं बसल्या आपल्या रेडिओ सेटच्या सहाय्यानें पारखलें जाऊं शकतें ही गोष्ट नभोवाणी खात्याला सहजच कळावी. एकंदर चाचणीला लाल फितीची बाधा शक्य तितकी कमी व्हावी. कलावंत आपला अहंकार आणि संवेदनशीलता कोणत्याहि फितीने बांधू देणार नाहीत हें उघड आहे.

संस्थानांच्या विलीनीकरणानंतर भारत–सरकारवर आलेलें कला–संवर्धनाचें उत्तरदायित्व व कलावंतांची विशिष्ट स्वभावप्रकृति लक्षात घेतां डॉ. केसकरांनी

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जातीने या विषयांत लक्ष घातलें पाहिजे. नाराज कलावंत व परीक्षा मंडळ या दोन पक्षांवर सलोख्याची जबाबदारी न टाकतां त्यांनी या कलावंतांच्या शिष्ट-मंडळाशीं स्वत: भेटून हा बेबनाव थांबवावा अशी आमची डॉ. केसकरांना विनंती आहे.

हिमालयावर स्वारी

१. ता. २९ मे १९५३ रोजीं मानवी संस्कृतीच्या इतिहासाचें एक उज्वल पान सुवर्णाक्षरांनी लिहिलें गेलें. निसर्ग व मानव-प्रयत्न यांच्या गिर्यारोहणसंबंधीच्या तीसपस्तीस वर्षांच्या दुर्दमनीय झुंजींत निसर्गाला अखेर हार खावी लागली व मानवप्रयत्नाची मान वर उंच राहून तिच्या गळ्यांत विजयाचा स्पृहणीय हार पडला. कर्नल 'हंट' यांच्या नेतृत्वाखालीं गेलेल्या ब्रिटिश तुकडीने, जगांतील अत्युच्च शिखर 'सरगमाथा'* अथवा गौरीशंकर किंवा 'एव्हरेस्ट' यावर त्या दिवशीं आपलीं पहिलीं पाऊलें टाकून, अमेरिका, नेपाळ व ब्रिटन यांचीं विजयी निशाणें तेथे फडकावलीं व 'सरगमाथ्या'हूनहि मानवसंस्कृति अधिक सरस आहे हें जगाला जाहीर करून सांगितलें. भारताचे रहिवासी शेरपा तेनसिंग व न्यूझीलंडचे ई. पी. हिल्लरी या गिर्यारोहकांच्या अपूर्व विक्रमामुळे त्यांच्या स्तुतिस्तोत्रांनी वर्तमानपत्रांचे रकाने सध्या ओसंडत आहेत. शिखरावर प्रथम चढून जाण्याच्या श्रेयांत, भारतीय शेरपा तेनसिंग याचा बराचसा वाटा आहे ही बातमी वाचून भारतीयांना विशेष आनंद वाटावा यांत नवल नाही. पण तेनसिंग याने भारताचा तिरंगी झेंडाहि तेथे फडकाविला हें वृत्त ऐकून भारतवासीयांच्या हृदयांत आनंदाने किती उंच उसळ्या मारल्या असतील तें वर्णन करून सांगतां येत नाही.

२ खाण्यापिण्याची विपुलता, सुखसाधनांचा भरपूरपणा, औद्योगिक भरभराट यामुळे कोणत्याहि राष्ट्राला सुसंपन्न म्हणावें लागेल; पण गीतेमध्ये वर्णिलेल्या दैवी संपत्तींपैकी 'अभय' गुणांसारखे गुण जर राष्ट्रांत नसतील, तर राष्ट्राची दौलत असून नसून सारखीच. प्रतिकूल परिस्थितीशीं एकसारखें झुंज देत राहणें, निसर्ग अनुकूल नसतांना धाडसाचीं व साहसाचीं अनेक लहानमोठीं कृत्यें धीर न सोडतां करीत राहणें, यामध्ये एक प्रकारचा 'संजीवनी' गुण आहे. शेरपा तेनसिंग या भारतीय वीराने आपल्या उदाहरणाने, 'अभय' गुणाचें मूर्तिमंत दर्शन भारतीय युवकांच्या निराशा मनाला करून दिलें आहे. परमेश्वर करो व युवकांचीं बेचलेलीं मनें हा धडा नीट गिरवोत!! या दृष्टीने तेनसिंगाने भारताच्या संपत्तींत अत्यंत मोलाची भर टाकली आहे.

३ वरील घटनेमुळे आणखी एक विचार मनांत येतो. इंग्रजी वाङ्मयाच्या इतिहासाकडे नजर टाकली, 'इलिजाबेथ' राणीच्या कारकीर्दींतील वाङ्मयाच्या सुवर्णयुगास काय कारणें झालीं याची मीमांसा वाचूं लागलों तर इंग्रज वीरांचीं दर्यावरील धाडसीं कृत्यें 'स्पॅनिश आर्मेडाचा' चक्काचूर वगैरे अश्रुतपूर्व घटनांनी लेखकांनाहि एक प्रकारची प्रेरणा मिळाली हें म्हणणें खरें वाटूं लागतें. मराठी वाङ्मयांत साहसी कथांचें दालन अगदीच शुष्क आहे. हेरांच्या खऱ्या-खोट्या रूपांतरित गोष्टींवर मराठी वाचक आपली तहान सध्या भागवीत आहेत. त्यापेक्षा 'गिर्यारोहणाचें महाकाव्य' एखाद्या मराठी महाकवीने निर्माण करून, कणखरपणा, करारीपणा, सोशिकपणा, दृढ निश्चय तेजस्विता इत्यादि दैवी गुणांचा आविष्कार, विविध मनोहारी घटनांनी व आपल्या वेधक शैलीने वाचकांच्या डोळ्यासमोर उत्पन्न केला, तर सुदृढ व काटक शरीरांतील सौंदर्य, दुर्दमनीय हिंमतीच्या डोळ्यांतील लावण्य व धीरोदात्त गुणांच्या हालचालींतील धीरगंभीर विलास पाहण्याची चटक, साहसप्रेमी भारतीय युवकांना लावण्याचें श्रेय त्याला मिळाल्यावाचून राहणार नाही. जॅक लंडनच्या अशा प्रकारच्या कथा या संदर्भांत वाचकांना सहज आठवतील. शेरपा तेनसिंह यांचा अपूर्व विक्रम अशा प्रकारें भारतीय लेखकांना नवनिर्मितीसाठी प्रोत्साहित करील तो भारतीय वाङ्मयाच्या भाग्याचा दिन ठरेल.

* गौरीशंकरचें नेपाळी जुनें नांव.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेशाची ऐतिहासिक पार्श्वभूमि : ४

नागानन्द नाटकांतील रूपक

लेखक--प्रा. डॉ. विनायक वामन करंबेळकर, नागपूर

नागपूर, नागनदी, नागरधन इत्यादि नांवें, मध्यप्रदेशांत ज्या नाग राजांचीं राज्यें होऊन गेलीं, त्या ऐतिहासिक नागराजांचीं अवशिष्ट स्मृतिचिन्हें आहेत. भारतवर्षांत अतिप्राचीन काळापासून नागराजांचीं राज्यें पसरलेलीं होतीं. वैदिक, पौराणिक, बौद्ध, जैन वगैरे साहित्यांत नाग लोकांचे उल्लेख आढळतात. महाभारतांतील खांडववनांतील नागांचा संहार, जनमेजयाचे सर्पसत्र, सिन्धुसंस्कृतींत आढळलेलीं नागपूजेचीं चिन्हें व कौशाम्बी, साञ्ची, अमरावती, बक्सार इत्यादि ठिकाणच्या बौद्ध अवशेषांत आढळणारीं नागांचीं चित्रें बुद्धोत्तर काळांतील नागवर्चस्वाचा पुरावा पुरवितात. शिशुनाग (इ. स. पू. ७३३–४४४), वैदेशिक नाग (इ. स. पू. ४ थें शतक), नवनाग (इ. स. २ रें शतक व नंतर) इत्यादि नागवंश भारतांत इ. स. च्या चौथ्या शतकापर्यंत राज्य करीत होते. नन्दिनागांनाच भारशिव म्हणतात. ताम्रपट व पुराणें या दोन्ही आधारांनी भारशिव व वाकाटक यांचा निकटचा संबंध दाखवून दिला. वाकाटकनृप रुद्रसेन प्रथम हा भवनाग भारशिवाचा नातू (दौहित्र) होता.

नाग–गरुडांचें वैमनस्य

या सर्व नागराजांचें गुप्त सम्राटांशीं नित्य वैर होतें. याचेंच जणू निदर्शक म्हणून गुप्त सम्राटांनी 'गरुड' हें आपलें राजचिन्ह बनविलें होतें. प्रयाग येथील समुद्रगुप्त-प्रशस्तींत-'भारतीय राजे गुप्त सम्राटचें गरुडांकित शासन मिळवून राज्य करीत' (–गरुत्मदङ्क स्वविषय भुक्तिशासन ''); चन्द्रगुप्त (द्वितीय) गुप्तांच्या नाण्यांवर 'उभा गरुड', 'मनुष्यासारखे हात असलेला गरुड', 'नाग धरलेला गरुड' असे छाप आहेत. स्कन्दगुप्ताने आपल्या जुनागढ येथील शिलालेखांत नागांचें बंड मोडून काढलें असा उल्लेख केला आहे. (नरपतिभुजगानां मानदर्पोत्फणानां । प्रतिकृतिगरुडाज्ञां निर्विषीं चावकर्ता") यावरून 'गरुड' हें गुप्तसाम्राज्याचें, सामर्थ्याचें व दराऱ्याचें प्रतीक होतें असें दिसतें.

नागांचा संहार

प्रयागच्या समुद्रगुप्त प्रशस्तीवरून समुद्रगुप्तानें नागराजांचा फार मोठा संहार आर्यावर्तांत घडवून आणला. त्याने मध्यभारतांतील कान्तिपुरी, पद्मावती, मथुरा, अहिच्छत्र, स्तुघ्न वगैरेचे गणपतिनाग, नागसेन, अच्युत, नागदत्त, मतिल, इत्यादि नागराजांना युद्धांत ठार केले. वाकाटक नृप रुद्रसेन (रुद्रदेव I) हा देखील नागपक्षीय होता म्हणून समुद्रगुप्ताचा वैरी होता. तो देखील या आर्यावर्ताच्या लढाईंत मारला गेला. पुढे चंद्रगुप्ताने यौधेय (एका बलाढ्य नागगण) गणराज्याचा निकाल लावला. स्कन्दगुप्तानेहि नागांचें एक बंड मोडून काढलें हें वर आलेंच आहे. या प्रमाणे इ. सनाच्या ४–५ शतकांत नागराजे व त्यांचे पक्षपाती यांचा गुप्त-सम्राटांनी अगदी मोड करून त्यांना देशोधडीस लावलें. त्यानंतर चन्द्रगुप्त (द्वितीय) गुप्ताने स्वविजयाचें चिन्ह म्हणून गरुडांकित नाणीं प्रचारांत आणलीं; स्वतः कुबेरनागा नामक नागराजकन्येशीं विवाह केला आणि तिच्यापासून झालेली प्रभावतीगुप्ता नांवाची मुलगी वाकाटक नृप रुद्रसेन (द्वितीय) यास दिली.

नागानंद नाटकाचें कथासूत्र

हर्षवर्धन (इ.स.६१०–६४८) नृपाच्या 'नागानन्द' नामक नाटकांत या नाग–गरुड विरोधाची कथा आली आहे.

जीमूतकेतु नामक विद्याधर राजाचा पुत्र "जीमूतवाहन" या नांवाचा होता. पित्याने त्यावर राज्यकारभार सोपविला होता तरी देखील पित्याची सेवा करण्यासाठी तो पित्याजवळ मलयपर्वतावरील एका आश्रमांत राहत असे. इकडे मतंग नामक विद्याधराने जीमूतवाहनाचें राज्य बळकाविलें. जीमूतवाहन मलयपर्वतावर राहत असतानां गौर्याश्रमांत हिंडतां हिंडतां मलयवती नांवाची सिद्ध राजकन्या त्याच्या दृष्टीस पडते. दोघांची परस्परावर प्रीति जडते. नंतर कांही काळानें

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

दोघांचा विवाह होतो. त्यानंतर मलयवतीचा भाऊ मित्रावसु जीमूतवाहनास त्याचें राज्य परत मिळवून देण्यासाठी मतंगावर स्वारी करण्याची तयारी दाखवितो. पण जीमूतवाहन त्यास संमति देत नाही.

एक दिवस जीमूतकेतु मलयपर्वताच्या पायथ्याशीं असलेल्या समुद्रावर येतो. तेथे त्याला नागांच्या हाडांचा ढीग दिसतो. 'गरुड नित्य एक नाग भक्षण करतो; पूर्वी त्याने अनेक नागांचा संहार केला; त्या नागांचीं हीं हाडें आहेत अशी त्याला माहिती मिळते. तेव्हा तो नागांचें संरक्षण करण्याची प्रतिज्ञा करतो. एवढ्यांत गरुडाला बळी जाण्यासाठी शंखचूड नांवाचा नाग तेथे येतो. गरुड येण्याचीच ती वेळ होती. जीमूतवाहन नागाच्या जागीं रक्तवस्त्र परिधान करून उभे राहण्यास तयार असतो. पण शंखचूडास हें मान्य होत नाही. म्हणून जीमूतवाहन त्यास गोकर्ण महादेवाच्या दर्शनास पाठवून देतो व आपण वध्यशिलेवर उभा राहतो. गरुड जीमूतवाहनास उचलून नेतो. गरुडास आपली चूक कळून येते पण फार उशीरा. जीमूतवाहनास भयंकर जखमा झालेल्या असतात. शंखचूड नाग ही वातमी जीमूतकेतु, मलयवती वगैरेंना सांगतो. सर्वत्र आक्रोश होत असतांना गौरी प्रसन्न होते व अमृत शिंपडून जीमूतवाहनास सजीव करते. नंतर नायक गरुडाकडून नागांना मारणार नाही असें वचन घेतो.

अनेक मतभेद :

प्रस्तुत नाटकाबद्दल संशोधकांत अनेक मतभेद आहेत. कोणी हें नाटक हर्षवर्धनाने लिहिलेंच नाही असें म्हणतात. त्यांच्या मतें कोणा 'धावक–भास' नामक कवीने तें लिहिलें व राजा हर्षवर्धनास विकलें. कांहींच्या कल्पनेप्रमाणे वाणभट्टाने प्रस्तुत नाटक लिहिलें, परंतु हुत्सिंग नामक चिनी यात्रेकरूच्या " Record of the Buddhist Religion " या ग्रंथांतील उल्लेखावरून हर्षवर्धनानेच 'नागानंद', 'रत्नावलि' व 'प्रियदर्शिका' हीं नाटकें लिहिलीं असें निर्विवादपणें समजतें. त्यामुळे हा नाटकाच्या कर्त्याबद्दलचा वाद निकालांत निघतो. नंतर हर्षवर्धन बौद्ध धर्माला अनुकूल होता; त्याने बौद्ध धर्माच्या प्रसारार्थ हें नाटक लिहिलें असें कांहींचें म्हणणें पडलें. अद्यापि हेंच मत सर्वत्र ग्राह्य मानलें जात आहे.

परंतु, जरी हें नाटक 'बोधिसत्त्वजातका'वर बसविलें आहे असें म्हटलें आहे.; जरी यांत "परार्थसंपत् बुद्धानाम्" हें तत्त्व अवलंबिलें आहे; जरी यांत बौद्धांची 'प्रतिपक्ष्या' तत्त्वाची कल्पना येते; जरी यांतील भाषा बौद्धतत्त्वज्ञानाची भाषा आहे असें वाटतें व जरी प्रथम बुद्धाच्या नमनाचे दोन श्लोक नान्दींत येतात; तरी हें नाटक बौद्धधर्म प्रसारासाठी लिहिलें असें म्हणतां येत नाही. कारण मधुवन, बांसखेडा वगैरे ताम्रपटांतून हर्षवर्धनाला 'परममाहेश्वर' म्हटलें आहे'. नाटकांत सर्वत्र ब्राम्हण धर्माचें वर्णन आहे–जीमूतकेतु वानप्रस्थाश्रमांत राहतो; अग्निहोत्र–उपासना करतो; नायक व नायिका यांच्या भेटी गौरीच्या आश्रमांत होतात; विदूषकाच्या बोलण्यांत ऋषि, हरिहर वगैरे देव, अग्निहोत्र, अतिथिपूजा हे विषय येतात; नायकाच्या मृत्यूनंतर गौरी त्यास अमृत शिंपडून जिवंत करते; व

वासोऽर्थं दययैव नातिपृथवः कृत्तास्तरूणां त्वचः ।
मग्नालक्ष्यजरत्कमण्डलुरजः स्वच्छं पयो नैर्झरम् ॥
दृश्यन्ते त्रुटितोज्झिताश्च बटुभिर्मौञ्ज्यः क्वचिन्मेखला ।
नित्याकर्णनया शुकेन च पदं साम्नामिदं गीयते ॥

हा श्लोक इत्यादि संदर्भावरून जसा हर्षवर्धन बौद्ध नव्हता तसा नायक जीमूतवाहनहि बौद्ध नव्हता असें ठरतें. कवीने तत्कालीन परिस्थितीला अनुसरून व सर्वधर्मांना प्रोत्साहन देण्याच्या आपल्या धोरणाप्रमाणें जीमूतवाहनाला बोधिसत्व मानलें; बौद्धग्रंथांची भाषा आत्मसात् केली; त्यांतील तत्त्वज्ञान कांही प्रमाणांत मान्य केलें; नाटकाच्या प्रारंभीं बुद्धाला नमन केलें. याप्रमाणे प्रस्तुत नाटक बौद्ध धर्मप्रचारार्थ लिहिलें गेलें नाही असें ठरतें.

नागानन्दाच्या कथेचें मूळ

नागानन्द नाटकाच्या कथेचें मूळ बौद्धजातक कथांत आढळत नाही असें आतां ठरल्यासारखें आहे. क्षेमेन्द्राच्या 'बृहत्कथामञ्जरींत' व सोमदेवाच्या 'कथासरित्सागरांत' जीमूतवाहनाची कथा येते. हे दोन्ही ग्रंथ गुणाढ्याच्या 'बृहत्कथेचें' संक्षेप आहेत. त्यामुळे नागानन्दाची कथा गुणाढ्याच्या काळापर्यंत (इ. स. पहिलें शतक) मागे जाते. महाभारतांत आस्तिकपर्वांत नाग-गरुडांच्या वैराची हकीकत आहे व आतां "सुपर्णाध्याय" नामक एका जवळ जवळ वैदिककाळाच्या अंतीं झालेल्या ग्रंथांत नाग-गरुडांच्या विरोधाची हकीकत दिलेली आढळते. म्हणजे बौद्ध-

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जातक ग्रंथांच्या पूर्वी नागानन्दाच्या कथेचें मूळ जाऊन पोहोचतें, सुपर्णाध्यायांत शेवटीं इन्द्र गरुडाला वर देतो—

> नागास्ते भक्षः सन्तु विहंगमेन्द्र
> वह यज्ञं प्रविश शूर वेदान् ।
> अध्येष्यन्ते त्वा ब्राह्मणाः स्वर्गार्थाः
> प्राप्स्यन्ति च त्रिदिवे संसदं नौ ।।

नागानन्दांतील रूपक

याप्रमाणे नाग गरुडाचें भक्ष होतें या कल्पनेवरच नागानन्द नाटकाची उभारणी झाली. वध्यशिलेवर शंखचूड नाग गरूडाला बळी जात होता तेव्हा जीमूतवाहनाने त्याचें संरक्षण केलें व त्यास पश्चिम समुद्रतीरावर कायम केलें या कथेंतील शंखचूड नाग म्हणजे एक मनुष्य होता व त्याचें मूळ कथेंत व नाटकांत सर्पाप्रमाणे वर्णन केलें आहे. परंतु गरूडानें शंखचूडाच्या ऐवजी जीमूतवाहनास उचलून नेलें व त्याचें मांस भक्षण करण्यास आरंभ केला. तथापि त्याला रोजच्या नागमांसाहून आज कांही विशेष आहे असें वाटलें नाही ! शंखचूड नागाला देखील गरुडाच्या या चुकीबद्दल आश्चर्य वाटलें. तो उद्‌गारला.

> आस्तां स्वस्तिकलक्ष्म वक्षसि तनौ नालोक्यते कञ्चुको
> जिह्वे जल्पत एव मे न गणिते नाम त्वया द्वे अपि ।
> तिस्रस्तीव्रविषाग्निधूमपटलव्याजिह्मरत्नत्विषो
> नैता दुःसहशोकसीत्कृतमरुत्पीडाः फणाः पश्यसि ।।

परंतु ही कवीच्या इच्छेने गरुडाने मुद्दाम चूक केली होती. या नाटकांतील नाग शंखचूड म्हणजे जसा सर्प नव्हता त्याप्रमाणे जीमूतवाहन हा नुसता विद्याधर राजपुत्र नव्हता.

मागे उल्लेखिल्याप्रमाणे गरुडाने (गुप्तसम्राटांनी) नागांचा (नागवंशांतील राजांचा) संहार केला. त्यामुळे नागवंशीय लोक देशोधडीस लागले. त्यांपैकी एखादा दक्षिणेस कोंकणच्या आसपास हिंडत असतां त्याची त्याच्याचप्रमाणे निर्वासित बनलेल्या चालुक्य द्वितीय सत्याश्रय पुलिकेशीशीं गांठ पडली. उभयांनी परस्परांना साहाय्य केलें. पुलिकेशीला स्वतःचा चुलता मंगलेश हाच शत्रु होता. त्या विरुद्ध तोंड द्यावयाचें होतें. त्या कार्यात त्यास अनेक मित्रांची गरज होती. ऐहोळे येथील शिलालेखांत पुलिकेशीने मंगलेशाचा पराभव करून आपलें राज्य कसें परत मिळविलें याची हकीकत आली आहे. नंतर पुलिकेशी क्रमाक्रमानें बलवान बनत गेला व त्याने स्वतःच्या पराक्रमाने संपूर्ण दक्षिण भारताचें सम्राटपद मिळविलें. त्याने कलेल्या दिग्विजयांत कोंकणांत त्याचा मौर्यांशीं संघर्ष झाला व मौर्यांचा निःपात केल्यावर त्याने आपल्या नागमित्राची कोंकणच्या सिंहासनावर स्थापना केली. तो नागमित्र म्हणजे कपर्दी शिलाहार अथवा प्रस्तुत नाटकांतील शंखचूड.

(१) नाटकांतील रूपक पुढीलप्रमाणे आहे.

- जीमूतवाहन—पुलिकेशी द्वितीय चालुक्य. (पुत्र)
- जीमूतकेतु—कीर्तिवर्य (पिता).
- शंखचूड नाग—कपर्दी शिलाहार
- मतङ्ग—मंगलेश (शत्रु)

नाटकांतील घडामोडीचें स्थळ—गोकर्ण, पश्चिम समुद्राजवळ.

(२) जीमूतवाहन आणि पुलिकेशी दोघेहि एके वेळीं निर्वासित होते; दोघेहि उदार व शूर होते; दोघेहि चक्रवर्ती होणारे होते; दोघांच्याही चांगल्या स्वभावाचा फायदा शत्रूने घेतला होता. पुलिकेशी व हर्षवर्धन समकालीन होते व प्रतिस्पर्धी होते. पुलिकेशीनें हर्षाचा पराभव केला होता. म्हणून हर्षाला दक्षिणेकडील घडामोडीबद्दल कुतूहल होतें. म्हणूनच त्या 'निपुण कवीनें' राजपरिषदेपुढे या राजकीय नाटकाचा प्रयोग करविला.

(३) शंखचूड नाग म्हणजेच कपर्दी शिलाहार. शिलाहार राजे नागवंशी होते. त्यांच्या शासनपत्रांच्या आरंभीं जीमूतवाहनाच्या कथेचा श्लोक येतो—हें विशेष आहे.

(४) नाटकांतील मलय पर्वत, जीमूतवाहनाचें पश्चिम समुद्रावर जाणें; नागांच्या अस्थि पाहणें; समुद्रवर्णन; गरूडाचें नागशत्रु असें वर्णन; गोकर्णाचा उल्लेख; वेला-महीध्र (सह्य पर्वत) वगैरे सर्व गोष्टी नाटकांतील रूपक ओळखण्यास मदत करतात.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लघुकथा

पुरुषी स्वभाव

अनुवादक : द. चिं. सोमण

डॅनचा धंदा त्याच्यासारखाच साधासुधा होता. भाडें घेऊन मालाची वाहतूक करायची. वस्! कुठे विशेष बुद्धि लढवायला नको वा कुठे धोका पतकरायला नको.

त्याचें व कॅटीचें छान जमे. फार सारखेंपणा होता त्यांच्या स्वभावांत; निदान प्रथम कांही दिवस तरी फार पटायचें दोघांचें! योग्य कुलपाला योग्य चावी असावी तसें होतें त्यांचें. डॅन आणि कॅटी! एकाशिवाय दुसऱ्याच्या अस्तित्वाला महत्वच नव्हतें जसें कांही!

तथापि अखेर अखेर कॅटीच्या मनांतून डॅन उतरायला लागला व शेवटीं साफ उतरला. कॅटीला लवकर लग्न व्हायला हवें होतें आणि डॅनचा स्वभाव तर अति संथ! कशाचाहि झटपट निर्णय घेणें त्याला कधीच जमत नसे. या लग्नाचेंच पहा ना. त्याला कॅटी फार आवडे परंतु त्याच्या मनांत एक मोठी माल-मोटार खरेदी करायची होती. ती लग्नापूर्वी घ्यावी. की नंतर हेंच त्याला कळेना. तसें म्हटलें तर त्याच्या स्वतःच्या खटाऱ्यावर तो संतुष्ट होता. पण कॅटीचाच आग्रह जबरदस्त होता. तिला मालमोटार हवी होती. "डॅन! तुला महत्वाकांक्षाच नाही कसली! असा कसा रे तूं?" तिचे नेहमीचेच उद्‌गार होते हे आणि म्हणूनच तोहि मोटारीबाबत विचार करायचा. तसा पैशानें तो गरीब; शिलकींतले व इतर पैसे मोटारींत खर्च झाले की लग्न लांबणीवर पडायचें आणि लग्नांत पैसे गेले की मग मोटार केव्हा घ्यायची?

पुढे पुढे कॅटीला डॅनची झोपडीहि आवडेनाशी झाली. किती जुनाट घर होतें तें! त्याच्या बापाच्या बालपणांत देखील तें जुनेंच असावें आणि नंतर अधिका-धिक जुनें होत गेलें असावें! कॅटीचा हेका असे की डॅननें तें घर का झोपडी काय होतें तें चक्क विकून शेजारच्या शहरांतच मुळी वस्तीला जावें; एक मोटार विकत घ्यावी व जोरांत धंदा करून भरभराटीला यावें. डॅनचे पाय त्या घरांतून निघत नसत पण! जिथे त्याचे वाडवडील हंसलेखेळले ती जागा त्याला प्रिय होती.

पांच वर्षें तीं दोघें एकमेकांवर अत्यंत प्रेम करीत होतीं. हातांत हात घालून तीं रात्रीं भोवतालच्या तुरळक झाडींत हिंडायचीं आणि प्रेमाची भाषा बोलतां बोलतां अखेर अचानक वादविवाद करूं लागायचीं! शेवटीं कडाक्याचें भांडण व मग दुसऱ्या दिवशीं पुन्हा प्रेम!

कॅटीला आईबाप नव्हते; दुसरेंहि कुणीच नव्हतें नात्याचें. अनाथ होती ती! लोकांच्या गाई म्हशींचें दूध काढून चरितार्थ चालवायची. सगळ्याच सुंदर तरुण मुलींप्रमाणे तीसुद्धा वरीच तापट व हटवादी होती. डॅनचा संथ धिमा स्वभाव आणि तिचा अधीर हट्टी स्वभाव यांच्या झगड्यांत अखेरीस व्हायचें तेंच झालें.

एक दिवस कॅटीने ठरविलें की आपलें यौवन जीवन डॅनला अर्पण करण्यांत कांही अर्थ नाही. शेजारच्या शहरांतला तो सेल्विन तिच्यावर प्रीति करीत होताच. देखणा होता दिसायला; शिवाय थोडेफार पैसेहि बाळगून होता. हं, मात्र दारू प्यायचा तो! परंतु कॅटी मिळत नव्हती म्हणूनहि कदाचित् पेले उचलीत असावा. निदान कॅटीला तरी तसें वाटे. आपल्या प्राप्तीनंतर त्याचें तें व्यसन अर्थात्‌च सुटेल असेंहि तिला वाटणें साहजिकच नव्हतें कां?

त्या दिवशीं संध्याकाळीं ती तातातावाने डॅनच्या घरीं आली. गांवाच्या एका कोपऱ्यांत होतें तें घर! कितीतरी घाण होती आवारांत सगळीकडे. नाही म्हणायला एक बाजूला डॅनने चारदोन फुलझाडें लावलीं होतीं. त्या झाडांपैकी एकदोन तुडवीतच कॅटी डॅनच्या माडीवरील खिडकीखाली येऊन उभी राहिली. खोलींत दिवा होता वर; डॅन माडीवरच होता.

"डॅन! खिडकीशीं ये जरा. कांही सांगायचें आहे तुला. महत्वाचें. फार महत्वाचें. डॅन! एऽ डॅन!" ती ओरडली.

डॅन खिडकीशीं आला. चांगला नव्हता तो दिसायला. गरुडाच्या बांकदार चोंचीसारखें नाक होतें त्याचें!

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

"डॅन! मी मागे तुला ती चादर नाही कां दिली; वर विणकाम करून; ती खाली टाक! मला ती परत हवी आहे! तुझ्याशी लग्न करायचं नाही असं मी ठरवलं आहे. तो सेल्विन आहे ना; त्याची बायको होणार आहे मी! तो सेल्विन; मासे विकतो तो!"—आणि स्वत:भोवती एक गिरकी घेऊन तिने टिचकी वाजवली.

डॅन क्षणभर चपापला पण लगेच मोठमोठ्याने हंसायला लागला.

"निघ येथून. जा. त्या मासेवाल्याच्या टोपलींत जाऊन बस. जा! हो चालती!"—तो एकदम ओरडला.

कॅटीने एक दगड उचलून तो डॅनला फेकून मारला. डॅनच्या छातीवरच लागला तो! खिडकींतून तिच्याकडे पहात डॅन छाती चोळीत पुन्हा हंसायला लागला.

"सुरेख नवरा मिळाला आहे मला! कुणी भिकारी नाही की गोगलगाईसारखा संथ नाही! छान चपळ पैसेवाला आहे. प्रेताबरोबर लग्न लावायचं टळलं सुदैवाने!"— डॅनकडे पहात कॅटी हातवारे करीत म्हणाली.

"हो चालती! तुम्ही दोघंहि हलकट आहांत! निघ! सडक्या अंड्यांची जोडी वरी तुमच्यापेक्षा!"

"तुला सेल्विनचा हेवा वाटतो ना? दे ती चादर परत! आणि ती मॅरी आहे ना; ती लंगडी! तो छान शोभेल तुझी बायको! दे ती चादर!"

"चादर परत मिळायची नाही!" असें म्हणून डॅन खिडकीपासून दूर झाला व त्याने सावकाश खिडकी बंद केली.

अंधार पडूं लागला होता. शेवटीं डॅन, त्याचें जुनाट घर, त्याचा खटारा, घोडा, फुलझाडें या सर्वांना शिव्या देत कॅटी तियून निघून गेली.

तें भांडण नेहमीसराखें दुसऱ्या दिवशीं मिटणारें नव्हतें हें डॅनने ओळखलें होतेंच. कॅटीने सेल्विनशी लग्न लावलें आणि नदीपलीकडील त्या शहरांत तीं दोघें राहूं लागलीं.

कॅटीचें लग्न लागलें त्या रात्रीं डॅन जरा विलक्षण वागला! बाळगलेल्या कबुतरांपैकी एका गुबगुबीत पक्ष्याची मान कापून त्याने त्याचीं पिसें उपटलीं आणि नंतर मांस नीट भाजून त्याने तें खाऊन टाकलें. मग जवळपास एक गॅलन बीर दारूहि त्याने घशांत ओतली. त्यानंतर निजायच्या खोलींत एक मेणबत्ती लावून मोठमोठ्याने गाणीं म्हणत तो अगदी झोप लागेपर्यंत बसून राहिला. त्याच्या घोगऱ्या गळ्यांतून बाहेर पडणारीं तीं सगळीं बेसूर गाणीं स्त्रीप्रेमाबद्दलचींच होतीं.

लग्नानंतरचीं पहिली दोन वर्षें कॅटी फार मजेंत होती. जाडयाभरड्या कपड्यांत वावरणारी पूर्वींची कॅटी आता तऱ्हतऱ्हेच्या तलम पेहेरावांत गावांतील रस्त्यांतून मिरवूं लागली. तथापि त्यानंतर मात्र लवकरच तिच्या चेहऱ्यावरचा तो तजेला हळूहळू मावळूं लागला; तिची केशरचना अव्यस्थित होऊं लागली!

तिचें लग्न तिला वाटलें होतें तसें सुखावह होत नव्हतें. लहान मुलाप्रमाणे तोंड सदा अर्धवट उघडें ठेवून वावरणारा सेल्विन अगदीच विनडोक्या होता. त्याचें दारूचें व्यसन सुटण्याऐवजी कमाल वाढलें मात्र होतें. नेहमी गुत्त्यांतच मुक्काम असायचा त्याचा! घरांत भांडणें होऊं लागलीं व सेल्विन आणखीच पिऊं लागला. दुकानांतील मासे जागींच सडून दुर्गंधी पसरवूं लागले. दुकान हळूहळू नामशेष होत होतें; तेंहि सडून चोथा होत होतें!

कॅटीला दु:ख झालें! आरंभीं आरंभीं नटण्यामुरडण्यांत मन रमवायचा प्रयत्न ती करूं लागली. परंतु आता तिचें पूर्वींचें लावण्य जाग्यावर नव्हतेंच! शेतांत बनकावळा उभा करतात तशी ती दिसायची! कित्येक वेळां रडत बसायची आणि अनेकवेळा सेल्विनशीं भांडून मारामारी शिवीगाळ करायची!

आणि डॅन! विलक्षण बदलला होता तो! कॅटीने त्याला झिडकारल्यापासून सारें लक्ष त्याने धंद्यांत घातलें होतें. चांगली भरभाट होत होती त्याची! त्याचा पूर्वींचा खटारा व घोडा यांच्याऐवजी हप्तेबंदीने घेतलेली एक मोटार आता त्याच्या आवारांत असे. सारें आवार देखील कसें नीटनीटकें स्वच्छ ठेवायचा तो! पूर्वींचें तें जुनें घर त्याने सोडलें नाही परंतु व्यवस्थित डागडुजी करून त्याची कळा मात्र त्याने पूर्ण पालटून टाकली. घरीं आल्यावर तो एखादें भांडें शिजवी आणि एकटाच कसल्यातरी विचारांत मग्न

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

होऊन खाई! त्याच्या गालांवरील मांस मात्र हळूहळू ओसरत होतें. व अगोदरच चोंचीसारखें असलेलें नाक आता अधिकाधिक वर येऊन त्याच्या चेहऱ्याच्या उग्रतेंत वाढती भर घालीत होते. अलीकडे अलीकडे दारूला स्पर्श करीत नसे तो! गुत्याकडे फिरकायचाच नाही. काम आटपून घरीं आला की लाकडाचा एखादा ठोकळा तो हातांत घ्यावयाचा. एकाग्र चित्ताने निरनिराळे प्राणी अथवा त्यांचीं मुंडकीं त्या लाकडांतून छान खोदून काढायचा! एक सुरेख दिवाहि त्याने विकत आणला होता आणि चमचे, काटे, सुऱ्या व एक घड्याळहि! इतकेंच काय पण अस्सल सोन्याची एक ठसठशीत आंगठीहि तो वापरूं लागला!

कॅटीनंतर दुसऱ्या कुठल्याच स्त्रीकडे त्याने कधी मान वळवून पाहिलें नाही. मोटारीमुळे आसपासच्या अर्धा डझन खेड्यांत त्याचा संचार चाले आणि फळ-फळावळ, अंडीं, भाजीपाला, कोंबड्या, कबुतरें यांची नेआण करण्यांत त्याचा दिवस केव्हाच सरायचा. त्याच्या कमाईकडे पाहून व त्याच्या कुरूपतेकडे डोळेझांक करून कांही बायकामुलींनी त्याला ओढण्याचा यत्न केला. परंतु डॅनच्या वागण्यांत त्यांना लवमात्र उत्तेजन न मिळाल्यामुळे त्यानाहि अखेर तो नाद सोडावा लागला!

एकदा आपल्या उघड्या हिरव्या मोटारींतून तो कॅटीच्या दुकानावरून जात असतांना कॅटी दुकाना-बाहेर पडलेली त्याला दिसली. डॅन मोटारींत बसल्या-बसल्याच पुढे वांकून ओरडला, "ए मासेवाली! सडलेल्या मच्छीचा काय भाव आहे सध्या?"

आणि ती बघत असतांनाच डॅन मोटार घेऊन पुढे चालता झाला.

कॅटीच्या लग्नानंतर चार वर्षांनी एका नोव्हेंबर महिन्यांत रात्रीच्या वेळीं अकस्मात् सोसाट्याचा वारा वाहूं लागला. डॅनचें ठोकळे खोदण्याचें काम चालूच होतें. इतक्यांत कुणीतरी खिडकीशीं असल्याचा त्याला भास झाला. त्याने मान वर उचलून पाहिलें. खिडकीच्या कांचेच्या तावदानांतून, बाहेरच्या बाजूला उभी असलेली कॅटी त्याला दिसली. हातांतल्या ठोकळ्यांतून जन्म घेणाऱ्या कोल्ह्याच्या कानांचा आकार रेखीव करीत डॅन खाली पहात खदखदा हंसला!

खिडकीच्या कांचेवर मूठ मारून कॅटीनें तिचें तावदान फोडलें. कांचा लागून तिचा तळहात रक्त-बंबाळ झाला. डॅन बसल्या जागेहूनच तिच्याकडें बघत होता.

"डॅन! कडी काढ ना दाराची. आंत घे मला! गोठून गेलें आहें मी!"

"चालती हो!"—डॅन ओरडला.

"डॅन! रक्त गोठलं आहे माझं! दिवसभर उपाशी आहें मी!"

डॅनने कॅटीच्या गालफडे बसलेल्या चेहऱ्याकडे नीट निरखून पाहिलें व मानें खाली घालून तो पुन्हा ओरडला, "चालती हो! जा, आपल्या त्या नवऱ्या-कडे जा!"

"तुझ्या मोटारींतून पोहोचव मला, डॅन!"

डॅन मुकाट्याने उठला आणि त्याने जवळचा दिवा फुंकरून टाकला. दुसऱ्या मजल्यावरील आपल्या निजायच्या खोलींत तो चालता झाला. जिन्यावर त्याचीं पावलें वाजलीं. तीं कॅटीने ऐकलीं.

कॅटी मुकाट्याने पुन्हा रस्त्याला लागली. ती तुरळक झाडी ओलांडून रखडत रडत सहा मैल मागे टाकून कॅटी पुन्हा तिच्या घराकडे परतली. दिवसाच्या विक्रीचे पैसे सेल्विनने दारूंत उडवल्याने त्याच्याशीं भांडून ती डॅनकडे गेली होती.

महिन्यानंतर कॅटी पुन्हा डॅनच्या घरीं आली. यावेळीं तिचे कपडे फाटले होते; चेहरा अधिकच निस्तेज झाला होता.

तेव्हा खिडकीशीं उभी राहून ती ओरडली, "डॅन! सेलविन्चं दिवाळं निघालं. आमचं दुकान आजपासून कायमचं बंद झालं! डॅन! आता घर नाही मला! आंत घे मला डॅन! डॅन!"

डॅन पुन्हा खांदे घुसळीत खिदळला.

"डॅन! मी दिलेली ती चादर परत दे. ती विकून पोटाला कांही देऊं शकेन मी! डॅन! दे ती विणकाम केलेली चादर!"

"रात्रीं पांघरायला लागते ती मला!"—डॅन हंसत म्हणाला.

"डॅन! तुझ्या घरांतलीं सारीं कामं करीन मी! आणि एका कोपऱ्यांत निजेन. पगार नको मला! डॅन! आंत घे मला!"

खोदकाम हातावेगळे करून डॅन उठला व दिवा मालवून झोपायला निघून गेला.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

पुन्हा रडत रखडत कॅटी परतली.

नंतरच्या आठवड्यांत सेलविन् अचानक कुठे बेपत्ता झाला! कर्ज टाळण्याकरता त्याने सोईस्कर मार्ग काढला होता. निराधार कॅटीने एका भिकार हॉटेलांत भिकार पगारावर कशीबशी नोकरी मिळविली.

जीवनाच्या विटंबनेने कॅटीच्या डोळ्यांत वारंवार पाणी जमे. सारें सारें आठवें तिला आणि कासावीस होई ती!

नंतरच्या जानेवारींत पडत्या बर्फांतून पुन्हा एकवार कॅटी रडत रडत डॅनकडे आली.

डॅन पैसे मोजीत होता. तिच्याकडे बघत त्याने उजव्या हातांतली नाणीं खळकन डाव्या तळहातावर ओतली. दिव्याचा उजेड नाण्यांवर पडून तीं चकाकलीं.

"डॅन! आंत यायचं आहे मला! डॅन! आपली म्हण कॅटीला! तुझ्याच कॅटीला! डॅन! माझं हृदय गोठलं आहे; करपलंहि आहे रे! डॅन! मला जवळ घे पुन्हा; पुन्हा ऊब दे!"

डॅन पुन्हा गदगदून हसला व एकदम ओरडला, "चालती हो! तुझा तो. मासेवाला नवरा कर्ज बुडवायला समुद्रांत गेला आहे; तूंहि जा त्याच्या मागोमाग! निघ!"

"डॅन! आता माझे डोळे उघडले आहेत, क्षमा कर मला! फार फार चुकलं माझं! डॅन! आसरा दे मला, नाही नको म्हणूस! किती प्रेम होतं तुझं माझ्यावर! तें आठव आणि दार उघड डॅन!"

डॅनने सारीं नाणीं गोळा करून पिशवींत भरलीं व थैली हातांत घेऊन दिवा विझवून तो झोपायला गेला.

सकाळीं उठल्यावर डॅनने पुढचा दरवाजा उघडला आणि कॅटीचें प्रेत दारांतून अर्धें आंत पडलें. तिच्या अशक्त चेहऱ्याकडे व जीर्ण वेषाकडे बघवत नव्हतें. केवळ हाडांचा सांपळा डॅनच्या पुढ्यांत पडला होता. कॅटीच्या एकेकाळच्या गुबगुबीत देहावरचें सगळें मांस नाहीसें झालें होतें!

डॅन तिच्या छातीवर डोकें ठेवून दहा मिनिटें ओक्साबोक्शी रडला. मग त्याने अश्रु पुसले व तडक जाऊन पोलीस ठाण्यावर कॅटीच्या मृत्यूची वर्दी दिली.

"माझ्या उंबरठ्यांत जीव दिला तिने! तुम्ही तिचं प्रेत हलवा तिथून! मी जातों माझ्या कामाला!" —असें म्हणून आपली मोटार घेऊन तो आपल्या रोजच्या कामाला चालता झाला.

सरकारी खर्चानेच कॅटीचें दफन झालें.

दुसऱ्याच दिवशीं कॅटीची विणकाम केलेली ती चादर त्याने दहा शिलींगांना विकून टाकली.

कॅटीच्या मरणानंतर डॅनने आपलें घर आंतून बाहेरून हिरव्या रंगाने रंगवलें, नवीन सूट शिवला' नवें घड्याळ घेतलें.

परंतु आता डॅन पूर्वीचा राहिला नाही. त्याची प्रकृति सारखी ढासळत गेली, डोळे निस्तेज होत गेले व देह कृश होऊं लागला. खोदकाम करतांना त्याचा हात थरथर कांपे! त्याचें सारें वागणेंहि रेंगाळत व्हायचें!

आणि कॅटीच्या मृत्युनंतर वर्षाच्या आंतच तोहि जग सोडून गेला.

"कॅटी! सेलविन्ची कॅटी!"— असें म्हणतच त्याने प्राण सोडला.

[Rhys Davis ची The Nature of Man ही कथा]

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

कांही कविता

हसूं कसा मी उगाच उसनें

भिजल्या जर या विद्ध पापण्या
हसूं कसा मी उगाच उसनें;
आकाङ्क्षांच्या सरणावरतीं
माउं कसा मी उल्हासाने !....

विनाश आहे सारा भंवतीं !
क्षितिजांच्याहि पल्याड आहे स्वैर पसरली
यमधर्माची काळी छाया;
चिरन्तनाच्या फुटक्या कवटया
रडती अगतिक अन्धारांतच स्फुन्दत स्फुन्दत,
धुळींत खुपसुन व्याकुळ काया !!
थिजले डोळे बघती जर हें नित नेमाने,
कसा तरीहि,
उगाच अपुले ओठ जुळवुनी
नव आशांचें गाऊं गाणें !

निळ्या महालीं अरे, चन्द्रमा
करांत घेउन निजतंजाचे अमृतकुम्भ
रोज घालितो सहस्रभोजन;
सांजसकाळीं तसाच सविता
आसुसलेल्या उन्मादानें घट्ट कवळितो
दिशादिशांचें रक्तिम यौवन !
असतां परि मम हृदय आणि हें पोट रिकामें,
कसा तरीहि,
उगाच अपुले ओठ जुळवुनी
नव आशांचें गाऊं गाणें ! ....

लावुन खोटें वोट मधाचें
रचिली ज्यांनी सुखस्वप्नांची मायानगरी,
वसुन्धरेच्या करुण वेदना
विसरून जे जे नित्य दौडले दूर अंबरीं,
खुशाल गावो विश्व तयांची महा आरती !
अन् उदण्ड पसरो युगयुग त्यांची कीर्ति !!
परि रुचति न मज जर व्यभिचारी ते ढोंगधतुरे,
कसा तरीहि,
उगाच अपुले ओठ जुळवुनी
नव आशांचें गाऊं गाणें !........

—वसंत निनावे

फूटपाथचे अम्हि रहिवाशी—

फूटपाथचे अम्हि रहिवाशी
रोजच मरणें अमुचें जीवन
जळो संस्कृती, नागर नीती
मूल्यांना ये इथे प्रेतपण ! १

लाज नियळते लक्तरांतुनी
धूळ भक्षिणें सांजसकाळीं
धुळींत जगणें धुळींत मरणें
धूळच केवळ अमुच्या भाळीं ! २

मिरवत जातें धन रस्त्यांतुन
मोटारींतुन अन् बग्गींतुन
अमुच्या माथीं पुढें धुळीचीं
कुबेर अुधळी गुर्मीने पण ! ३

कुठे कुणाचें पाप वितें अन्
इथे आमुचें हवन क्षणोक्षण
दोष कुणाचा बळी आमुचा
जाच, वंचना, टांचा वरतुन ! ४

धुळींत सडणें धुळीस मिळणें
कुवर धूलिकण अमुचें प्राक्तन
उद्या अुसळतिल याच धुळींतुन
विश्वक्रांतिचे क्षुब्ध अग्निकण ! ५

—मधु वाबगांवकर

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आज तुझ्या नजरेंत —

आज तुझ्या नजरेंत दाटलें धुंद चांदणें निळें
तयांत लहरत आणि चंदनी भावगंध दर्वळे.

सहज स्मितांतुन नितळ सांडतां निशिगंधाचीं फुलें
अधर खालचा उले, तलमशा शहारून परिमळें

तरंगतें बोलणें त्यांतहि मधुवंतिची माधुरी
कधी तान रेशमी स्वरांची उधळित ये कस्तुरी.

हालचाल हलु, आळसलेलीं जणुं कमळाचीं दळें
चरणचाल थबकती केशरी विस्मयांत बुचकळे.

मौनांतहि मिरविति अर्थांची सोनेरीं पांखरें
नवें कुसुंबी अबोध कांहीं श्वासांतुन थर्थरे.

आज तुझ्या नजरेंत दाटलें धुंद चांदणें निळें
तयांत उजळत तुलाच नकळत झळके तव मन-तळें !

—उ. रा. गिरी

भेट—

दो नयनांची भेट जहाली
परस्परांच्या हृदयामधली
फुलें मधुरतर क्षणीं विकसलीं
तनु तुझी लवचीक कोवळी अन् थरथरली ग
तिथेच अपुली प्रीति जुळली
पाणवठयावर ! घागर भरली
कितिक वेळा ! शांती न झाली
घरीं क्षणभरी जाण्याची तुला भ्रान्त न उरली ग
वाऱ्यावर गवताचें पातें
कांहितरी घोंगावत होतें
आणि मेघ वर गर्जत होते
परी तुझ्या हृदयांतुन बिजली माता चमकली ग
मिटले होते नेत्र सृष्टिने
निजलीं होतीं बाळस सुमनें
भृंग्यांचीं थांबलीत भ्रमणें
एकच मुग्ध कळी राहिल मात्र उमलली ग

—श्रीपाद गंगाधर कावळे

पारा फुटला—

पारा फुटला, बिंदु सूटला
पर्वत आणिक उभा तडकला
नदी वाहिली—तगमग नुसती;
प्रति किरणांतुन अश्रु चमकला !

शतशत बिंदू, वर्तुळ पोकळ
क्षितिजा लोंबे अगतिक भोंवळ;
धरा गरगरे—भिरभिर नुसती !
काळ गोठला स्मृतिवर केवळ !!

निराकार ह्या वायूमध्ये
करुणेचा आकार उमटला;
—वाचेवांचुन ओठ हालला.
—खोल उसासा हृदयीं अडला !

—क्ष

खिस्त होतों मी—

पूर्व जेव्हा लाल होते
देत वाणी या खगा
मी कवी होऊनि गातों
रम्य भूपाळी जगा !
आणि जेव्हा येत माझी
साऊली पायातळीं
प्रेरणा हो गात्रयाला
क्रान्तिगीतें मोकळीं !
बिम्ब सूर्याचें ढळें तें
जेधवा वेळेकडे
खिस्त मी होऊनि देतों
शान्तिचें विश्वा धडे !

—वसंत वऱ्हाडपांडे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

यायाचें जर कधीहि झालें

यायाचें जर कधीहि नव्हतें
आलिस मग तूं पुन्हा कशाला ?
नीरवतेपरि नदी किनारीं
भेटलीस तूं मला कशाला ?

भेटायाचें कधीहि नव्हतें
संथप्रवाही मिळशि कशाला ?
बोलायाचें कधीच नव्हतें
ओढ लाविली जिवा कशाला ?

यायाचें जर कधीच नव्हतें.
दंव बिंदूपरि मंद पाडलीं
कशास आलिस शुभ्र पाखरें
उडवित नीलंम डोळ्यांमधलीं

यायाचें जर कधींहि नव्हतें
भल्या पहाटे कशास आली ?
निज स्वप्नांचें दान देउनी
जाग मनींची कशास नेली.

यायाचें जर कधीहि झालें
दंवस्नात तूं मोर पिसापरि
रिमझिम यावें सांजसकाळीं
स्वर्ण कणांच्या अभिसारापरि !!

—मनोहर प्रभाकर

ढगा आडच्या चंद्रा--

(पादाकुलक)

ढगा आडच्या चंद्रा का रे !
मुखा आपुल्या असा लपविशी ? ।
तसेंच झाकुनि ठेवतोस का
नक्षत्रांच्या अपुल्या राशी ? ॥१॥

गुरु–पत्नी–संभोग तुझा तो
काय आजला तुला जाचतो ? ।
पहा आमुच्या जगांत वेडया !
मात्रा गमनी खुशाल फिरतो ॥२॥

काय मुखाचा कलंक अपुला
अशा परी तूं लपवूं बघशी ? ।
'निष्कलंक ना परमेशाविण
कांही जगिं या'–का न जाणसी ॥३॥

मेघ आडवे होतां गगनीं
तुलाहि पडतें का रे ! बंधन ? ।
का आम्हासम तुलाहि छळतो
हा हटवादी निसर्ग निर्घृण ? ॥४॥

"परिस्थितीचा गुलाम मानव—"
हें रडगाणें आम्हीं गावें ।
निसर्ग–काला–परिस्थितीला
आम्हा परि कां तूंहि नमावें ॥५॥

निसर्गावरी मात कराया
सिद्ध आज परि झालासे नर ।
चंद्रलोक बघण्यास तुझा तो
दुर्बळ असता यततो भूवर ॥६॥

परंतु तूं तर स्वस्थपणाने
निसर्गापुढे हार मानसी ।
आणि झाकुनी वदन आपलें
नव वधुसा का गडया लाजसी ? ॥७॥

ढगा आडच्या चंद्रा ! आता
दूर ढगाचा पडदा करणें ।
खुला करुनि तव सौंदर्याचा
खजिना, जगता गडया ! खुलविणें ८॥

जगीं चारुता वाढवावया
दान देव दे सौंदर्याचें ।
तुझी रम्यता अशी झाकुनी
गुन्हेगार का तूं व्हायाचें ॥११॥

अथवा स्वतंत्र भारत खंडित
म्हणून तुज का दुःख हो महा ।
परंतु पुढती हें सारें जग
विलीन होई भारतीं पहा ॥१२॥

स्वाराज्यासम सुराज्य येथे
शांतीमय नांदेल खरोखर ।
आणि जगाचें विश्व–भारतीं
रूप उद्या बघशील मनोहर ॥१३॥

—प्रा. मा. ल. व्यवहारे

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

प्राचीन साहित्यिकांचे मनोविनोद

प्रा. श्री. भा. वर्णेकर

प्राचीन संस्कृत साहित्यशास्त्रांत कवीचें जीवन कसें असावें, त्याची दिनचर्या कशी असावी, त्याच्या घराची साजसजावट कशी असावी, त्याचे सेवक, परिजन कसे असावेत, त्याची लेखनाची जागा व इतर साहित्य कसें असावें, त्याच्या आहारविहाराच्या वेळा कोणत्या असाव्यात यासंबंधी सविस्तर माहिती सांगितलेली आहे. कवीच्या दिनचर्येसंबंधी प्राचीन साहित्यकारांनी कांही नियम सांगितले आहेत:—

कवीने पंचपंच उषःकाळीं संध्यापूजा आटोपावी व नंतर सारस्वत सूक्ताचा पाठ त्याने करावा. त्यानंतर त्याने आपल्या अध्ययनगृहांत बसून काव्यविद्या, व्याकरण, कोश, छंदःशास्त्र व इतर ६४ कला यांचें मनन करावें. हा सर्व अभ्यास कवीने दिवसाच्या पहिल्या प्रहरांत आटोपावा. दुसऱ्या प्रहरीं कवीने आपली नित्याची काव्यरचना करून मध्यान्ह प्रहरीं पुनश्च स्नान करून भोजन करावें. भोजनोत्तर वामकुक्षीच्या नांवानें सामान्य माणसाप्रमाणें झोप न काढतां त्याने संपूर्ण तिसरा प्रहरभर "काव्यगोष्टी" कराव्या असें शास्त्रकार सांगतात. प्राचीन राजनीतिशास्त्रज्ञांनी ज्याप्रमाणें राजपुरुषासाठी एक विशिष्ट प्रकारची आदर्श दिनचर्या सांगितली आहे, त्याप्रमाणे भारतीय साहित्यशास्त्रज्ञांनी कविजीवनाचा स्वतंत्र कार्यक्रम सांगितला आहे. याचा अर्थ काव्योपासना किंवा वाङ्मयसेवा हा फावल्या वेळीचा एक रिकामटेकडा छंद नसून ती एक स्वतंत्र जीवनप्रणाली आहे. वर्णाश्रम धर्मानुसार निरनिराळ्या वर्णांचा व निरनिराळ्या आश्रमांचा स्वतंत्र जीवनक्रम जसा धर्मशास्त्रज्ञांनी सांगितला आहे, त्याचप्रमाणे साहित्यशास्त्रज्ञांनी कवि हा एक स्वतंत्र वर्ण किंवा आश्रम समजून कवीजनांसाठी स्वतंत्र प्रकारचा जीवनक्रम सांगितला आहे. प्रस्तुत लेखांत दिवसाच्या तिसऱ्या प्रहरीं प्राचीन काळचे कविजन ज्या "काव्यगोष्ठी" करीत किंवा जो निरनिराळ्या प्रकारचा मनोरंजनात्मक वाङ्मयीन विलास करीत त्याची आपणास ओळख करून द्यावयाची आहे.

कविजनांच्या बैठकींत काव्यकलाकोविद रसिकजनांचाच समावेश होत असे. असे व्यासंगी, बहुश्रुत व प्रतिभाशाली विद्वज्जन एकत्रित बसले म्हणजे त्यांचे स्वैरालापसुद्धा मोठे उद्बोधक व चित्ताकर्षक होत असतील यांत नवल काय ? त्या काळच्या साहित्यिकांच्या बैठकींत विशेष प्रकारे वाङ्मयविलास होत असे. निरनिराळ्या महाकवींच्या काव्यग्रंथांवर चर्चा करणें, साहित्यविषयक शास्त्रीय विषयांसंबंधी ऊहापोह करणें इत्यादि गोष्टी कसल्याहि पूर्वनियोजनावाचून साहित्यिकांच्या बैठकींत आज जशा चालतात तशा त्या त्याहि काळांत चालत होत्या हें सांगावयास नको. या अनियोजित वाङ्मयविलासाव्यतिरिक्त कांही नियोजित स्वरूपांचे वाङ्मयविलासहि त्या काळचे साहित्यिक करीत.

*** प्रतिमाला योग** (अन्त्याक्षरी स्पर्धा)— ही वाङ्मयक्रीडा आजहि समाजांत भंड्या नांवाने थोडीफार चालू आहे. पाठांतराची सवय जसजशी मोडत चालली तसतसा हा वाङ्मयप्रकार बंद पडत आहे. या क्रीडेत साहित्यिकांच्या स्मरणशक्तीची परीक्षा होत असे.

*** दुर्वाचन योग**—कठिण व कठोर शब्दांचे श्लोक प्रतिस्पर्ध्यापुढे लिहून ठेवण्यांत येत असत. विशेष प्रकारचे संस्कार जिभेवर न झालेल्या साहित्यिकास त्याचें नीट वाचन देखील करणें कठीण असतें. साहित्यिकांच्या स्पष्टोच्चार शक्तीची, किंवा शुद्धोच्चार शक्तीची परीक्षा पाहण्याकरतांच ही दुर्वाचन योग नामक क्रीडा साहित्यिकांच्या बैठकींत चालत असते. वात्स्यायन कामसूत्राच्या जयमंगला टीकेंत या दुर्वाचन योगाचा एक श्लोक दिला आहे. तो आधुनिक साहित्यिकांनी वाचून पहावा म्हणजे हा खेळ किती कठीण होता याची थोडी कल्पना येईल.:—

दंष्ट्राग्रद्धर्या प्राग्यो द्राक् क्ष्माम्ब्वन्तः स्यामुच्चिक्षेप ।
देव ध्रुटक्षिद्धचूत्विक्स्तुस्त् युष्मान् सोऽव्यात्
सर्पात्केतुः॥

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

*मानसी किंवा बिंदुमती कला—प्रतिस्पर्ध्यासमोर अक्षरांच्या ऐवजी कमल, वकुल, चंपक इत्यादि फुलें ठेवण्यांत येत. त्या पुष्पवाचक शब्दांतून निरनिराळीं अक्षरें घेऊन त्यांत स्वतःच्या पदरचे स्वर घालून अर्थयुक्त पद्यरचना करण्यांत येत असे. या खेळाचे निरनिराळे आणखीहि कठीण प्रकार होते, त्यांपैकी एक प्रकार असा की प्रतिस्पर्ध्यासमोर प्रत्यक्ष फुलें न ठेवतां केवळ फुलांचीं नांवें सांगून प्रतिपक्षाकडून श्लोकांतील केवळ स्वर, अनुस्वार व विसर्ग विचारण्यांत येत.

*अक्षरमुष्टि—या खेळाचे (१) साभासा व (२) निरवभासा असे दोन प्रकार होते. साभासा अक्षरमुष्टी-मध्ये श्लोकांतल्या शब्दांतील केवळ आद्याक्षरांचा निर्देश करण्यांत येई व या आद्याक्षरांच्या आधारें साहित्यिकाला श्लोकरचना करून दाखवावी लागे. साभासा अक्षरमुष्टीसंबंधी एक प्राचीन दंतकथा प्रसिद्ध आहे ती अशी—

एकदा एक वैय्याकरण व वैदिक पंडित आपला अभ्यास संपवून स्वतःच्या गांवाकडे परत येण्यास निघाले. वाटेंत त्यांना स्वयंपाक करावयाचा होता. वैदिक ब्राम्हण मोठा आचारशील होता. तो आपलें नित्याचें कर्मकांड करीत असतांना स्वयंपाकाची पूर्वतयारी म्हणून वैय्याकरणाने पाकसिद्धीची सर्व सामग्री जमा करून ठेवली. पण चुलींतलीं लाकडें पेटावयला त्याला कोठेहि अग्नि आढळेना. तेव्हा पूजापाठांत गढलेला वैदिक ब्राम्हण त्याला म्हणाला, " अरे, अग्नि तर ब्राम्हणाच्या मुखांतच असतो. चुलींतल्या लाकडांवर तूं फुंकर घाल म्हणजे तुझ्या मुखांतल्या अग्नीनें आपोआप इंधन पेट घेईल."

वैय्याकरण फुंकर मारूं मारूं थकून गेला. पण चुलींत अग्नीची एक ठिणगी देखील त्याला आढळली नाही. शेवटीं आपला पूजापाठ टाकून वैदिक ब्राम्हण उठला व त्याने चुलींत एक फुंकर घातली त्याबरोबर धडधडा लाकडें पेटलीं.

हा चमत्कार पाहून वैय्याकरणाच्या मनांत त्याच्याविषयी मत्सर उत्पन्न झाला व त्याने त्याला त्याच अरण्यांत ठार मारण्याचा विचार केला. वैदिक ब्राम्हणाच्या लक्षांत ही गोष्ट आली तेव्हा त्याने वैय्याकरणाला म्हटलें, "मी देतों तेवढें पत्र माझ्या पित्याला तूं नेऊन दे." वैय्याकरणाने त्या वैदिकाला ठार मारल्यानंतर तें पत्र त्याच्या पित्याला नेऊन दिलें. त्या पत्रांत " अ प्र शि-ख " अशीं केवळ चारच अक्षरें लिहिलेलीं होतीं. त्यांचा अर्थ न समजल्याने ब्राम्हणाने तें पत्र अर्थज्ञानासाठी भोजराजाच्या पण्डितसभेंत सादर केलें. भोजाने सर्व पंडितांना १ महिन्याच्या आंत चार अक्षरांचा अर्थ सांगण्याची आज्ञा दिली. अर्थ न सांगितल्यास शिरश्छेदाची शिक्षा देण्याचें उद्‌घोषित करण्यांत आलें. सर्व पंडित त्या विकट समस्येमुळे जीव मुठींत धरून पळून गेले. त्यांपैकी वररुचि नांवाचा एक पंडित एका जंगलांत जाऊन राहिला. रात्रीच्या वेळीं एका ठिकाणीं कोल्हा व कोल्ही मांस खात होतीं. उद्या भोजाच्या सभेंतील पंडितांचें मांस खायला मिळणार ही माहिती कोल्हा कोल्हीला सांगू लागला व ह्याचें कारणहि कोल्ह्याने कोल्हीला सांगितलें. तेव्हा कोल्ही कोल्ह्यास म्हणाली, " त्या चार अक्षरांचा अर्थ तुम्हाला येतो काय ? " तेव्हा कोल्ह्याने तिला त्या अक्षरांचा अर्थ सांगणारा श्लोक म्हणून दाखविला. तो श्लोक असाः—

अनेन तव पुत्रस्य प्रसुप्तस्य वनान्तरे ।
शिखामारुह्य पादेन खड्गेन निहतं शिरः ॥

बाजूला बसलेल्या वररुचीनें दुसरे दिवशीं हा श्लोक सभेंत सांगून सर्व पंडितांचे प्राण वाचविले. ही दंतकथा साभासा अक्षरमुष्टीचें उत्कृष्ट उदाहरण आहे.

*निरवभासा अक्षरमुष्टीः—नेत्रपल्लवी करपल्लवी म्हणून ज्या कला प्रसिद्ध आहेत त्यांचा अंतर्भाव निरवभासा अक्षरमुष्टी नांवाच्या साहित्यक्रीडेंत होतो. तळहात व मूठ यांचे निरनिराळे आकार दाखवून निरनिराळे अक्षरांचे वर्ण सूचित करण्यांत येत. उदा:— क वर्गाच्या सूचनेकरता मूठ वांधीत, च वर्गाकरता पानाप्रमाणे तळहाताचा आकार करीत. याप्रमाणे इतर वर्गांकरतांहि हाताच्या निरनिराळ्या आकृति करीत व वर्गांतील ज्या अक्षराचा निर्देश करावयाचा असेल त्या क्रमांकाचे बोट दाखवीत असत. उदा.— ग म्हणावयाचा असल्यास क वर्ग सूचक मूठ दाखवून नंतर तिसरें बोट दाखवीत असत. निरवभासा अक्षरमुष्टीचे निरनिराळें संकेत सांगणारे कांही जुने श्लोक पुढीलप्रमाणे आहेत.

(१) मुष्टिः किसलयं चैव छटा चारी पताकिका।
पताका कुशमुद्राश्च मुद्रावर्गेषु सप्तसु ॥
(२) आदर्शकमलं चक्रं टंकारतलहस्तकम् ।
पत्रं च याचकं षट्कं भावासु करपल्लवी ॥

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

***बिन्दुच्युतक**—या साहित्यक्रीडेंत पद्यांतील अनुस्वार काढावे लागत. अनुस्वार काढले म्हणजे मगच श्लोकांना अर्थ येत असे. हर्षकवीच्या नैषधकाव्यांत दमयंतीच्या या बिन्दुच्युतक उल्लेख पुढील श्लोकांत केला आहे.

चकास्ति बिन्दुच्युतकातिचातुरी।
घनाश्रु बिन्दुसृतिकैतवात् तव ॥
मसार तारक्षि ससारमात्मना।
तनोषि संसारमसंशयं यतः॥

(हे दमयंती तूं आपल्या नेत्रांतून अश्रुबिन्दूंचा स्राव करण्याच्या निमित्ताने स्वतःची बिन्दुच्युतकचातुरी प्रकट करीत आहेस. तुझ्या या बिन्दुच्युतक चातुर्यामुळे हा संसार संसार होत आहे. दमयंतीच्या नेत्रांतून गळणारे अश्रु हे जणु बिन्दुच्युतक क्रीडेंत गळणारे अनुस्वारच आहेत.

बिन्दुमती—या क्रीडेंत श्लोकांतील अक्षरें काढून टाकत व केवळ अनुस्वार शिल्लक रहात. कवीला अनुस्वाराखाली योग्य त्या अक्षरांची पूर्ति करावी लागत असे.)

***मात्राच्युतक**—श्लोकांतील मात्रा काढून टाकण्यात येत. कवीला मात्रांची पूर्ति करावी लागे.

उदा०—महाशयमतिस्वच्छं नीरं संतापशान्तये।
खलवासादतिश्रान्ताः समाश्रयत हे जनाः॥

यांतील "नीरं" शब्दांतील मात्रा काढल्यास "नरं" हा शब्द मिळतो. व त्याला अनुकूल असाहि अर्थ या श्लोकांत आढळतो. श्लोकांतील सर्व विशेषणें नर आणि नीर (पाणी) या दोघांनाहि लागूं पडतात.

***चित्रबंध**—कमल, खड्ग इत्यादि निरनिराळ्या वस्तूंच्या आकृत्या काढण्यांत येत. व त्या आकृतीमध्यें विशिष्ट प्रकाराने बसवितां येईल अशा प्रकारची शब्दरचना असलेला श्लोक कवीला करावा लागे.

उदा०—मा रमा सुषमा चारु रुचा मारवधूत्तमा।
मात्तधूर्ततमावासा सा वामा मेऽस्तु मारमा॥

हा श्लोक अष्टदल कमलाकृतीमध्यें नीट मांडतां येतो.

समस्यापूर्ति—श्लोकाची एखादी ओळ सांगितल्यानंतर तिचा समावेश ज्यामध्यें करतां येईल असा श्लोक तयार करून दाखविणें.

उदा. :—"गुलुगुगुलू" या समस्येची पूर्ति एका कवीनें पुढील प्रमाणें केली आहे.

जम्बूफलानि पक्वानि पतन्ति विमले जले।
कपिकंपितशाखाभ्यो गुलुगुग्गुलुगुग्गुलू॥
"ठंठंठंठं ठठंठंठंठः॥"
"हुंहुंहुंहुं हुहुं हुहु हुंहुं॥"

इत्यादि शेकडो समस्या संस्कृतज्ञांच्या समाजांत सर्वतोमुखीं झालेल्या आहेत. समस्यापूर्तीमध्यें कवीच्या प्रतिभेची व समयस्फूर्त कवित्वशक्तीची परीक्षा होत असे.

***प्रहेलिका**—प्रतिपक्षाला विचित्र प्रश्न विचारून त्यापासून अनपेक्षित स्वरूपाचें उत्तर मागणें हें या खेळाचें स्वरूप असे. मराठींत हा क्रीडाप्रकार 'उखाणे' या नांवानें प्रसिद्ध आहे. संस्कृत भाषेतील

कृष्णमुखी न मार्जारी द्विजिह्वा न च सर्पिणी।
पञ्चभर्त्री न पाञ्चालि यो जानाति स पण्डितः॥
(लेखणी)

अपदो दूरगामी च साक्षरो न च पण्डितः।
अमुखः स्फुटवक्ता च यो जानाति स पण्डितः॥
(पत्र)

इत्यादि शेकडो प्रहेलिका संस्कृत वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत.

***अपह्नुतिः**—प्रश्न ऐकतांच सुचणारें सरळ उत्तर चुकीचें आहे असें सांगून निराळ्याच प्रकारचें उत्तर ज्यांत सांगितलें असतें अशा प्रकारची श्लोकरचना अपह्नुतिकार करीत असत. हा काव्यप्रकार प्रश्नोत्तरात्मक स्वरूपाचा असतो.

रुचिरस्वरवर्णपदा रसभाववती जगन्मनोहरति।
तत्किं तरुणी न हि न हि वाणी बाणस्य मधुरशीलस्य॥

यासारख्या अनेक अपह्नुति संस्कृत वाङ्मयांत प्रसिद्ध आहेत.

याशिवाय कूटश्लोकांचें क्रियागुप्तम्, कर्मगुप्तम्, कर्तृगुप्तम्, करणगुप्तम्, सम्प्रदानगुप्तम्, अपादानगुप्तम्, सम्बन्धगुप्तम्, अधिकरणगुप्तम्, आमन्त्रितगुप्तम्, कर्तृक्रियागुप्तम्, कर्तृकर्मक्रियागुप्तम्, सन्धिगुप्तम्, समासगुप्तम्, लिङ्गगुप्तम्, सुब्वचनगुप्तम्, तिङ्वचनगुप्तम्, इत्यादि अनेक प्रकार साहित्यिकांच्या बैठकींत मनोविनोदार्थ चालत असत.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

वर सांगितलेल्या बिन्दुच्युतक व मात्राच्युतक या क्रीडाप्रकारासारखे विसर्गच्युतकम्, अक्षरच्युतकम्, स्थानच्युतकम्, व्यंजनच्युतकम्, च्युतदत्ताक्षरम्, इत्यादि अनेक प्रकार प्रसिद्ध आहेत.

***अन्तरालापः—**

भोजनान्ते च किं पेयं ? जयन्तः कस्य वै सुतः ?
कथं विष्णुपदं प्रोक्तं ? 'तक्रं शक्रस्य दुर्लभम् ॥'

या श्लोकाच्या चतुर्थपादाचा अर्थ विक्षिप्त स्वरूपाचा आहे. पण त्यांतील प्रत्येक शब्द इतर तीन पादांतील प्रश्नांचीं क्रमशः उत्तरें देतो.

कं संजघान कृष्णः ? का शीतलवाहिनी गङ्गा ?
के दारपोषणरताः ? कं बलवन्तं न बाधते शीतम् ?

या चारहि प्रश्नांचीं उत्तरें ठिकच्या ठिकाणींच आहेत. फक्त पाहणाऱ्याची दृष्टि नीट असली म्हणजे झालें. प्रश्न व उत्तरें स्वतःच सांगून प्रतिपक्षीयाकडून उत्तरें मागण्याचा हा प्रश्न संस्कृतसारख्या संपन्न भाषेंतच आढळूं शकतो.

***बहिरालापः**—हा प्रकार अंतरालापापेक्षा फारच कठीण आहे. अंतरालापांत प्रश्नाचें उत्तर जेथल्या तेथेच असतें. बहिरालापांत तें श्लोकाबाहेरील एका शब्दांत सांगावें लागतें.

का दुराढ्यस्य मोहाय ? का प्रिया मुरविद्विषः ?
पदं प्रश्नवितर्के किं ? को दन्तच्छदभूषणम् ?

या श्लोकांतील ४ प्रश्नांचेंहि उत्तर ज्यामध्ये सामावलेलें आहे अशा प्रकारचा एकच अर्थयुक्त शब्द प्रतिस्पर्ध्याला सांगावा लागतो. वरील श्लोकांत असलेल्या ४ प्रश्नांचें उत्तर रा–मा–नु–रागः (१) रा=संपत्ति (२) मा=लक्ष्मी (३) नु=वितर्कार्थक अव्यय. (४) रागः=रंग (लिप्स्टिक्.)

भाषाचित्रम्—

हरनयनजटालज्वालया "जो जलाया"
रतिनयनजलौघे "खाक बाकी बहाया"
तदपि दहति चित्तं "मा क क्या मैं करोंगी"
मदनसरसिभूयः "क्या बला आग लागी"

दोन किंवा अधिक भाषा जाणणारे साहित्यिक एकत्र बसले म्हणजे त्यांच्या बैठकींत वरील प्रकारची भेड-गुजरी, पद्यरचना निष्पन्न होत असे. दर वाक्यागणिक २–३ इंग्रजी शब्द वापरणाऱ्या आधुनिक सुशिक्षितांना स्वतःच्या भाषणांत वरील प्रकारच्या भाषाचित्राचा खेळ सतत चालू असतो याची कदाचित् कल्पना नसेल.

अशा प्रकारचें विविध बौद्धिक विलास किंवा बौद्धिक व्यायाम करण्यांत प्राचीन संस्कृत साहित्यिकांचा मध्यान्ह समय व्यतीत होई. एका प्राचीन साहित्यिकाने तरुणांना उद्देशून असा संदेश दिला आहे की—

उपचरितव्याः सन्तो यद्यपि कथयन्ति नैकमुपदेशम् ।
यास्तेषां स्वैरकथास्ता एव भवन्ति शास्त्राणि ॥

(हे तरुणांनो ! सज्जन लोकांनी तुम्हाला कांही विशेष उपदेश जरी न केला तरी तुम्ही त्यांची सेवा करा. कारण त्यांचे स्वैर कथालाप म्हणजे शास्त्रसिद्धान्त असतात.) कविजनांच्या बैठकींत प्राचीन काळीं वर सांगितल्याप्रमाणे अनेक प्रकारचे वाङ्मयविलास चालत. शांकरदिग्विजय महाकाव्यांत वर्णन केल्याप्रमाणे कविजनांचे हे वाङ्मयीन स्वैरालाप सतत कानीं पडण्याचें भाग्य ज्यांना लाभलें असे पोपटसुद्धा

"जगद् ध्रुवं स्यात् । जगद् ध्रुवं स्यात्"

अशा प्रकारची शास्त्रचर्चा करीत असतील तर त्यांत नवल काय ?

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आम्रमहिमा

[आंब्याच्या या मोसमांत हें रसाळ खंडकाव्य एक कुतूहल म्हणून आम्ही सादर करीत आहोंत. हें काव्य प्रथमतःच प्रसिद्ध होत आहे. या काव्याचा कर्ता, काळ, शैली इत्यादि विषयक तर्क आणि विचार वाचकांनी आमच्याकडे पाठवावे. —संपादक]

—मागील अंकावरून पुढे—

अंब्ररसु वाढीला ताटीं ।। वरि साकर घातली ते रिगाली पोटीं ।। घृत घातलें आड वाटीं ।। तें वरि शांति होउनि ठेलें ।।२८।। अंब्ररसु देखौनि ताटावरी ।। डेरां थरथरा कांपे क्षीरी ।। म्हणे येणें रसेंसीं वाढिलें जरी ।। तरि वुडैन मी ।।२९।। तवं सकळ पाकांमाजि समर्थु ।। आला तांदुळाचा भातु ।। तो म्हणे अंब्ररसा मि हातें हातु ।। मेळवीन तुजसीं ।।३०।। तवं अंब्ररसु कैसें वोलिला जाणा ।। म्हणे ‘ तुं पांचा पाटिलु पांच राणा : तुजवरि कढीचा वाजे[1] ताजणा[1] ।। जाये मजसीं पुरवेसि ना ।।३१।।तवं वारिया पुरिया सांजोरिया ।। अंब्ररसा जवळि आलिया ।। तो म्हणे ‘तेलें माखलिया आवघिया ’ ।। ‘सरा सरा मागें’ ।।३२।। आइकौनि अंब्रफळाची गोडी ।। वडेनि [2]चिंवाचां [2]डोहिं घातली उडी ।। तो फुगौनि राहिला देउनि वुडी ।। वाहीरि रीगेचि ना ।।३३।।तवं धावतु आला लाडु ।। म्हणे ‘अंब्ररसा, मी गुळेंसीं आहे गोडु’ ।। तो म्हणे ‘तुं कठिण कोरडा, खातां कडकड ।। मजसीं रूचेसिं ना ’ ।।३४।। तवं कैसें वोलिलें अमृतफळीं[3] म्हणे ‘अंब्ररसा आम्ही येवों तुज जवळीं ।। तो म्हणे ‘तुम्ही अरुवार कोवळीं : विराल मजमाजि’ ।।३५।। तवं आलिया फेणिया आणि...जीं ।। म्हणे’ अंब्ररसा, आम्ही येवों तुज सेजीं’ ।। तो म्हणे ‘तुम्ही विराल मज [1]सेजीं ।। सरा, सरा रे परतीं’ ।।३६।। तव मालतिया सेवेया गरवळी ।। ते म्हणति ‘ अंब्ररसा, आम्ही येवों तुजजवळि ।। तो म्हणे’ तुम्हीं उलाल कोवळीं ।। वुडाल मजमाजि ।।३७।। तवं अंब्ररसु देखौनि पळति कानवले ।। दडदडा धांवति फलफला दोंद हाले ।। म्हणे ‘तियाचियें भेटी गुळ जाईल मग भलें ।। कव्हणी न म्हणे आम्हा’ ।।३८।। तवं करंजिया कडकणे पहिलें ।। अंब्ररसातें देखौनि पळालें ।। ते जाउनि [2]फुलरवां राहिले ।। कुळदेवतेचां ।।३९।। तवं फुडकीं अंब्ररसेंसीं हासति खदखदां ।। म्हणति [3]‘आंम्हीं [3]मीळौनि तुझेया संवादा’ ।। तो म्हणे ‘ तुमचा मर्दना तेलकांदा ।। जा तया जवळि ’ ।।४०।। तवं अंब्ररसातें म्हणेति [4]भास्करी ।। ‘ आंम्हीं येवों गा जगद्धराचिया कुमरी ’ ।। तो म्हणे ‘ भाजीचि मीरवे तुम्हावरि ।। मजसि पाडु नाहीं ।।४१।। तवं दीवसीं दीढरीं हासिलीं कैसीं ।। म्हणेति ’ अंब्ररसा, आंम्हीं येवों तुजपासीं ।। तो म्हणे ‘दृष्टीं न पाहे वडेयासि ।। तेथ तुम्हीं काई ।।४२।। तवं धावत आली वाट रोटी ।। ते म्हणे ‘ अंब्ररसा, मि आंगें आहे मोठी’ ।। ‘तुं भरितें तेलेंसीं गोमटी ।। [5]धिटें सर वो सर मागे ,

---

१ प्रभाव गाजेल, मिरवेल. २ चिंचवणीच्या द्रोणांत. ३ अमृतफळ, एक प्रकारचें पक्वान्न.

१ जवळि, शेजारीं. २ फुलोरां, ३ आम्ही येंऊं. ४ भाकरी, सूर्यबिंबासारखी वाटोळी गरगरित. ५ धीट,

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

॥४३॥ तवं अंब्ररसातें म्हणे ॥ पोळी 'मि येवों गा अरुवार कोवळी' ॥ म्हणे 'नसे [1]मंडकु, तरि जवळि ॥ करीन तुतें ॥४४॥ तवं आवळें वेलें वसंत सुरणा ॥ आलें नींवें पापड भजिये मिळोन: ते पळाले अंब्ररसातें देखौन ॥ परि [2]आलें, [3]आलें [3]जवळि ॥४५॥ तेया देखौनि अंब्ररसातें ॥ पंचामृत [4]दध्य तेहि [5]कीजे [5]परतें ॥ तेय येरा शाकापाकातें ॥ कवण लेखी ॥४६॥ ऐसा शाका पाका लागला भेदारा ॥ आवघे जाउनि रिगाले हारा डेरां ॥ परि येकुहि नव्हेचि सामोरा ॥ तया अंब्ररसेंसीं ॥४७॥ तव मांडा अवसारला सरिसा ॥ म्हणे 'मि आलां रे आलां, अंब्ररसा' ॥ तो म्हणे 'आहे तुझा भर (?) ॥ ना चाल वेगीं' ॥४८॥ ऐसा तो सकळ पाकांमाजि श्रेष्ठ ॥ आला मांडेयाचा [6] वेठु ॥ तेणें धरिला तयाचा लोटु ॥ अंब्ररस आंवरिला ॥४९॥

१ फुलौरा, २ आम्ही येऊं, ३ भाकरी, सूर्यबिंबा-सारखी वाटोळी गरगरित, ४ धीट, धैर्यशील. ५ मांडे. ६ आलें जवळ आलें. ७ दही. ८ परत केलें जातें ९ मूर्ति, स्वारी.

तेया अंब्ररसा मांडेयाची रुचि कैसी ॥ अतिमधुर [1]अमृतापसि ॥ तेयालागि अमृत गेलें स्वर्गासि ॥ शरण रिगालें देवांसि ॥५०॥ तो अंब्ररसु घृतसाकरा ॥ [2]सज्जन सहपंक्तिसवें पुत्र पुडारा ॥ ऐसा वालेया वरि विडा अव-धारा ॥ मग [3]आइकीजे भाग्यीकथा ॥५१॥ ऐसें आंब्रे-यापसि ये मेदिनीं ॥ जो गोड फळ बोल्हें सभे येउनि ॥ दिधलें असति तया लागौनि ॥ सांगावेया सा मास ॥५२॥ जरि जाणता जाला [4]अतिराडें ॥ तरि कैंची सकल आगिकें फळें गोडें ॥ [5]सुगरणि जाली तरि काइ करील मांडे ॥ आपुलेया हाताचे ॥५३॥ ऐसें अंब्रफळ योग्य श्रीकृष्णनाथा ॥ कां ब्रम्हविदा त्याचिया ज्ञानिया भक्तां ॥ कां ज्ञानिया उतमां संतमहंता ॥ आणिका योग्य नव्हे ॥५४॥ ऐसें उत्तम अंब्रफळ जाणा ॥ तें आधीं वाढावें ऋषी ब्राम्हणा ॥ मग सेवावेया आपणां ॥ आपणेयां योग्य होये ॥५५॥...............(समाप्त)

१ अमृतापेक्षा. २ जनासहित. ३ ऐकावी. ४ अतिशय. ५ उत्तम स्वयंपाक करणारी.

स्विफ्टचा विलक्षण पाहुणचार

'गलिव्हरचा प्रवास' ही अमर उपरोधिका लिहिणारा डीन स्विफ्ट मानव-द्वेष्टा असला तरी आपल्या मित्रांवर त्याचें अतिशय प्रेम होतें. पण या मित्रप्रेमाची तऱ्हाहि लोकविलक्षण होती.

एकदा सुप्रसिद्ध कवि पोप एका मित्रासह स्विफ्टकडे संध्याकाळच्या गप्पांसाठी गेला. स्विफ्टने पोपला कांही तरी खाण्याचा अतिशय आग्रह केला. 'हो-नाही' म्हणतां पोपने स्विफ्टच्या शब्दांचा मान राखण्यासाठी संमति दिली. स्विफ्ट म्हणाला, "बरोबर, तुला कांही तरी खायला हवं हें मी ओळखलं. मला माहित आहे, तुला माझें, थोडंसं गोड पक्वान्न आणि दारू आवडते. खरं की नाही ?"

पोपने उत्तर दिलें, "खरं आहे." त्याला वाटलं की आपले आवडते पदार्थ आता खायला मिळणार. मित्राला खाऊं घालण्याचं स्विफ्टच्याहि मनांत होतं. तें त्यानं लगेच बोलून दाखवलं, "मग असं कर, या सगळ्या पक्वान्नांची किंमत येईल अर्धा क्राऊन; हा अर्धा क्राऊन घे आणि बाजारांत जाऊन तुला वाटेल तें खा."

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ग्रं थ स मा लो च न

सुश्लोकमानस भाग २ रा*

जुलै १९५२ च्या युगवाणींत मी सुश्लोकमानसाच्या पहिल्या भागावर समालोचनपर एक लेख लिहिला होता. आज दुसऱ्या भागावर लिहीत आहें. सुश्लोकमानस हा हिंदीचे प्रातःस्मरणीय संतकवि गोस्वामी श्री. तुलसीदासजी यांच्या रामचरितमानसाचा श्लोकबद्ध मराठी अनुवाद आहे. अनुवादक कॅप्टन श्रीखंडे व्यवसायानें डॉक्टर आहेत. संस्कृत भाषेवर त्यांचें अतोनात प्रेम आहे. त्यांनी दहा कोटी हिंदी भाषीयांत आणि हिंदी प्रांताबाहेरील भक्तांत नित्याच्या पाठांत असणाऱ्या रामचरितमानसाचा हा मराठी उलथा केला आहे.

मराठी भाषा बोलणाऱ्या आपणा महाराष्ट्रियांना गुंसाईजींच्या रामायणाचें माहात्म्य फार पूर्वीपासून कळलें आहे. गुंसाईजींचे समकालीन आपल्याकडील संत एकनाथ महाराज यांनी भावार्थ रामायण रचलें आहे. हे दोघे अकबराच्या राज्यत्वकाळांत विद्यमान होते. यानंतर तिसऱ्या पिढींत म्हणजे औरंगजेबाच्या राज्यत्वकाळांत आपल्याकडे समर्थ रामदास आविर्भूत झाले. ते रामोपासनेचे कट्टे पुरस्कर्ते होते. त्यांच्या भीमरूपी स्तोत्रांत आणि गुंसाईजींच्या हनुमानचालिस्यांत विलक्षण साम्य आहे. पेशवाईच्या ऐन भरभराटींत महाकवि मोरोपंत यांचा आविर्भाव झाला. मृत्यूच्या कांही काळ पूर्वी त्यांनी काशी, प्रयाग, गया इत्यादि उत्तरेकडील तीर्थांची यात्रा केली होती. थोर प्रज्ञेच्या या प्रतिभासंपन्न कवीनें महाराष्ट्रांत परततांना दोहा, सोरठा, चौपाई, सुरा, गज्जल इत्यादि उत्तरेकडील वृत्तें बरोबर आणलीं आणि त्यांत कवितारचना केली. पंतांनी पुढील शब्दांत गुंसाईजींचा गौरव केला आहे.

श्लोक केकावली मधील

प्रभुत्व तरि हेंच कीं करुनि दे कृपादान तें
स्वसाम्य यदुपार्जनें मिरवि जे स्वपादान तें
प्रभुत्व तरि तें कसें जरि निवारिना लाघवा ?
कसें दशमुखानुजा विसरलां अहो ! राघवा?

या कल्पनेंत, आणि तुलसीरामायणाच्या अयोध्या कांडांतील

प्रभुपण तेंचि म्हणावें कीं जें नीचाहि सादर धरीत
वन्हिहि धूमावरि शिरिं, अद्रितृणाही दिसें महद्रीत ।

या कल्पनेंत कामगिरीचा सारखेपणा आहे. केकेच्या चरणचरणांत रामायणांतील कथेचाच दृष्टान्त दिला आहे. तोहि लक्षांत घेण्यासारखा आहे. तेव्हा पंतांनी ('प्रतिक्षणिं नवीनच दे रुचि' अशा) तुलसी रामायणाचा चांगलाच अभ्यास केला असावा असें दिसतें. वर श्रीखंडयांचा मराठी तर्जुमा दिला आहे. मूळ हिंदी असें आहे.

प्रभु अपने नीचहु आदर हीं ।
अगिनि, धूम गिरिसिर तनुधर हीं

श्रीतुलसीरामायणाचे भुपटकर व प्रज्ञानंद सरस्वती यांनी केलेले अलिकडले समवृत्त मराठी अनुवाद सर्वांना ठाऊकच आहेत. जामदारांचें भाषांतर गद्यांत आहे. डॉ. श्रीखंड्यांनी आपल्या सुश्लोकमानसास त्याचाच आधार घेतला आहे. श्लोकबद्ध रचना हा डॉक्टरांच्या अनुवादाचा विशेष आहे. त्यामुळें इतर तीन अनुवादांपेक्षा त्यांच्या अनुवादाचें स्वरूप कांहीसें निराळें व नवें झालें आहे. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेच्या जाने., फेब्रु. व मार्चच्या अंकांत सुश्लोकमानसाच्या पहिल्या भागाचें समीक्षण करतांना क्षामच्या भगिनी सौ. उपाताई कोलते यांनी, डॉक्टरांनी गद्य अनुवाद करावयास हवा होता अशा अर्थाचा एक विचार प्रकट केला आहे. परंतु जामदारांचा गद्य अनुवाद अगोदरच अस्तित्वांत असतांना त्या प्रकारची खरोखर कांही आवश्यकता नव्हती. शिवाय श्लोकबद्ध रचना

---

* श्री सुश्लोकमानस भाग २ रा. अयोध्या, अरण्य व किष्किधा कांड. रचयिता कॅप्टन् रा. चिं. श्रीखंडे. मंगळवार, कोल्हापूर. मूल्य ५ रुपये.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

जशी तावडतोब तोंडीं खिळते तशी गद्य रचना लक्षांत राहत नाही हें सत्यहि यासंबंधीं ध्यानांत घेतलें पाहिजे. मुळांतील सुंदरतेला ढळ न पोंचेल अशा बेतावेताने आणि गाभ्यांतील भक्तिरसाचा ओघ अव्याहत वाहत राहील अशा आस्थेने डॉक्टरांनी हें मराठीकरण करण्यांत अपूर्व यश प्राप्त केलें आहे. ग्रंथवाचन करीत असतांना माझ्या मुखावाटें पुढील अनुष्टुप सहज बाहेर पडला:——

राघवाच्या पदीं वाही पूर्वीं श्रीतुलसीदलें
आता माथ्यावरी चर्ची श्रीखंडे केशरी टिळे

अनुवादकाच्या ठिकाणीं तीन प्रमुख गुण अपेक्षित असतात. मूळ ग्रंथाशीं तादात्म्य पावण्याइतपत तो सहृदय असला पाहिजे, समतानतेशिवाय त्याला मुळांतील जिव्हाळा आपल्या अनुवादांत उतरवतां येणार नाही. मूळ ग्रंथ ज्या भाषेंत असेल आणि तो ज्या भाषेंत उलथा करावयाचा त्या दोन्ही भाषांचें त्याला यथार्थ ज्ञान तर हवेंच, परंतु त्यांचें मर्म आकलन करण्याचें सामर्थ्य त्याच्या ठिकाणीं असलें पाहिजे. शिवाय ज्या भाषेंत ग्रंथ आणावयाचा, तिच्यांतील उचित व समर्पक शब्दांवर त्याचें हुकुमी प्रभुत्व असावयास हवें. दोन्ही भाषांतील वाक्प्रचार, संप्रदाय व म्हणी यांचें कोशांवरून मिळविलेलें ज्ञान त्याच्या उपयोगी पडत नाही. त्याला त्यांच्यांतलें इंगित व खुबी कळली पाहिजे.

वरील निरनिराळ्या दृष्टींनी सुश्लोक मानसाचा बहुतेक भाग निर्दोष आहे हें नमूद करण्यास आनंद वाटतो. अनुवादक या नात्याने डॉक्टरांची योग्यता किती मोठी आहे हें पुढे कांही सर्वश्रुत चरणांचे अनुवाद देतों त्यांवरून दिसून येईल;—

मंथरा कैकेयीच्या मनांत रामासंबंधी किल्मिष उत्पन्न करते. तेव्हा कैकेयी तिची थट्टा करते;—

" काने, खोरे, कूबरे, कुटिल, कुचाली जानि
तिय बिसेषि पुनि चेरि " कहि भरतमातु मुसकानि

हिंदी मुलुखांत हा दोहा फार प्रसिद्ध आहे. डॉक्टरांनी त्याचा अनुष्टुपांत अनुवाद केला आहे;—

" लंगडे, कुबडे, काणे, स्वभावें दुष्ट दुर्जन
त्यांत स्त्री, त्यांत बटकी ! " हांसे कैकेयि बोलुन.

मंथरा वरकरणी स्वतःला दोष लावून घेते आणि कैकेयीला दशरथाविरुद्ध भडकावते तेव्हाची चौपाई अशी;—

" करि कुरुप बिधि परबस कीन्हा
बवा सो लुनिअ, लहिअ जो दीन्हा
कोउ नृप होउ हमहि का हानी
चेरि छाडि अब होब कि रानी ? "

त्या चौपाईचें हें मराठीकरण पहा:——

" मातें कुरूप करुनी विधि दास्य देत।
जें पेरि तेंच भरि; देत तसेंचि घेत।
कोणीहि होउ नृपती मज काय हानि ? ।
दासीपणा सुटुनी व्हायचि मी न राणी "

यांतील तिसरा चरण उत्तर हिंदुस्थानांत सर्वांच्या तोंडीं म्हणीवजा खिळला आहे. त्याचा अनुवाद मूळाबरहुकूम हुबेहूब साधला आहे. परंतु दुसऱ्या चरणांत 'जें पेरि तेंच भरि' हे जे शब्द आहेत, त्यांतील 'भरि' हा शब्द अचूक नाही. मराठींत 'करावें तसें भरावें' आणि 'जसें पेरलें तसें उगवलें' असे दोन वेगवेगळे वाक्प्रचार आहेत. डॉक्टरांनी वृत्तसुखार्थ त्यांची सांगड घातली आहे. 'चेरि छाडि अब होब कि रानी ?' या तुलसीदासांच्या चवथ्या चरणांत प्रश्नालंकाराने 'मी दासी आता काय राणी होणार आहे ?' हा जो खोंचक व बोंचक आशय व्यक्त केला आहे, तो डॉक्टराच्या "दासीपणा सुटुनि व्हायचि मी न राणी !" या उद्‌गारात्मक चरणांत प्रकट झालेला नाही. दशरथ कैकेयीची समजाविशी करतांना पुढील भाषण करतो;——

" झूठे हुं हमहि दोषु जनि देहू ।
दुइ कै चारि मागि मकु लेहू
रघुकुल रीति सदा चलि आई।
प्रान जाहुँ पर बच नुन जाई

यांतील तिसरा चरण भारतांत सर्वत्र श्रुत आहे. त्यांचें डाक्टरांनी मराठींत जें भाषांतर केलें आहे तें तंतोतंत यथार्थ उरलें आहे:——

"द्यावास ना मजसि दोष तुवां प्रिये ! गे।
कां दोन मात्र ? वर चारहि आज गे घे
ही रीति राघव कुळीं रुळली सदाची।
जावोहि जीव परि भाक न ती फिरेचि."

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

डॉक्टरांच्या भाषांतर निपुणतेची साक्ष म्हणून हा श्लोक केव्हाहि पुढे करतां येईल.

सुश्लोकमानसाच्या पहिल्या भागाचें समालोचन करतांना मी पाठभेदांचा विचार आवश्यक आहे अशा अर्थाचें एक विधान केलें होतें. मंथरा कैकेयीला वश करते त्या प्रसंगाचें वर्णन तुलसीदासांनी पुढील शब्दांत केलें आहे:—

"कुबरीं करिकइ वलि कैकेई ।
कपट छुरी उर पाहन टेई
लखइ न रानि निकट दुखु कैसे ।
चरइ हरित तिन वलिपसु जैसे"

हें एक अर्थपूर्ण रूपक आहे. कुबडी मंथरा हीच कुणी कसाईण. तिनें कैकेयीला बळी बनवलें. आणि आपली कपटरूपी सुरी तिच्या ऊररूपी पाषाणावर परजली. ज्याप्रमाणें यज्ञवेदीवर बळी देण्यांत येणारा पशु आनंदानें हिरव्या कुरणावर चरत राहतो त्या प्रमाणेंच कैकेयीची स्थिति होती. वरील चौपाईतील पहिल्या चरणाचा एक अपपाठ आहे. तो असा:— 'कुबरीं करि कबूली कैकेई' डॉक्टरांनी हा अपपाठ स्वीकारल्यामुळे पुढीलप्रमाणे अनुवाद केला आहे:—

'कैकेयीमान्यता ऐशी कुब्जा घेइ परोपरी
राज्ञीच्या उरिं ती घाशी सहाणीं कपटी सुरी !
स्वताच्या लवना राशी विघ्ना निकट देखत
चरे यज्ञपशू जैसा हिरव्या तृणिं हर्षित.'

कुबडीला कैकेयीच्या मान्यतेची वास्तविक कांहीच गरज नव्हती. 'करिकइ वलि' म्हणजे 'बळी करून' असा मूळ पाठाचा सरळ अर्थ आहे; परंतु 'करि कबूलि' अशा अपपाठामुळे 'कबूल करवून' किंवा 'मान्यता मिळवून' असा भलताच अर्थ निष्पन्न झाला आहे. आणि त्यामुळे अर्थाचा अनर्थ होऊन घोटाळा उडाला आहे.

गुंसाईजींची चरित्रचित्रण कला अत्यंत सूक्ष्म, तरल व चित्ताकर्षक आहे. प्रसंगाला सहज उठाव मिळेल इतकेच शब्दांचे रंग त्यांनी हलक्या व हळुवार हातानें उपयोगांत आणले आहेत. त्यांच्या शब्दचित्रांत विविधता आहे.

मानसशास्त्राच्या दृष्टीने अयोध्याकांडांतील एक प्रसंग अत्यंत सूचक, संयमशील व सुंदर आहे. वनांत राम, लक्ष्मण व सीता विचरत असतांना तेथील गांवढळ स्त्रिया सीतेला भेटतात व हे दोघेजण कोण आहेत म्हणून प्रश्न करतात. त्यावर ती उत्तर देते. त्यांत सीतेचा लाजाळू व मर्यादशील स्वभाव व्यक्त झाला आहे. या प्रसंगाचें चित्र तुलसीदासांनी जितकें मनोज्ञ चितारलें आहे, तितकीच श्रीखंडचांनीहि त्याची प्रतिकृति मनोरम काढली आहे:—

"कोटि मनोज लजावनि हारे ।
सुमुखि कहहु को आहि तुम्हारे ?"
सकुचि सीय मनमहुँ मुसकानी ।
सुनि सनेहमय मंजुल वानी
तिन्हहि विलोकि विलोकति धरनी ।
दुहुँ सकोच सकुचति वरवरनी
सकुचि सप्रेम वालमृग नयनीं ।
बोली मधुर वचन पिकवदनी
"सहज सुभाय सुभग तन गोरे ।
नामु लखनु लघु देवर मोरे"
वहुरि वदनुविधु अंचल ढाँकी ।
पियतन चितइ, भौंह करि बाँकी
खंजन मंजु तिरीछे नयननि ।
'निजपति कहेउ' तिन्हहि सियसयननि

या मूळ चित्राचें हें तितकेंच मनोहर छायाचित्र पहा:-

"त्यांची विलोचन विभा शरदंबुजांची ।
कीं कामकोटिंसहि लाजविणार हेचि !
आहेत कोण तव हे वद गे ! अम्हांला ?" ।
ऐशा विचारिति विनीत तियेस वाला
ती प्रीति मंजुल वचें परिसोनि सीता ।
संकोचुनी मनिं, करि स्मित तुष्टचित्ता
पाहोनि त्यांसि फिरुनी अवनी विलोकी ।
संकोच दोहिं परिं तीस विशेष रोखी
सप्रेम सीता मृगशावलोचना ।
सलज्ज बोले मधु कोकीलस्वना
"ते गौरकांतीं मधुर स्वभावतां ।
हो धाकटे देवर लक्ष्मण स्वतां !"
वस्त्रांचलें आनन चंद्रझाकुनी ।
प्रियाकडे पाहत वक्रलोचनीं
वक्रभ्रुती खंजनमंजु सूचवी ।
'स्वकांतहे' त्यां निजनेत्रपल्लवीं !

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मूळ रामचरितमानसांत कल्पनेच्या दृष्टीने कितीतरी स्थळें सरस व रमणीय आहेत. त्या सर्वांचेंच दर्शन लब्धावकाश आणि पर्याप्त अवसर नसल्यामुळे येथे सम्यक् रीतीने करून देतां येणें शक्य नाही. मासला म्हणून केवळ एकाच स्थळाचा निर्देश करतों. दशरथ रामाला वनवासास जाण्यास सांगतात. तें वृत्त समजतांच सीताहि त्यांच्याबरोबर जाण्यास सिद्ध होते. ती त्यासंबंधी कौसल्येची संमति मिळविण्यास येते. त्या प्रसंगाचें हें चारुचित्र पहा:—

"चारुचरन नखलेखति धरनी ।
नूपुर मुखर मधुर कवि बरनी
मनहुँ प्रेमबस विनती करही ।
हमहि सीय पद जनि परिहरही

या मूळ हिंदीचें मराठी प्रतिबिंब;—

निज चरण नखाग्रीं भूमितें ती विलेखी ।
मधुररव करीती नूपुरें तें गमे कीं,
जणुं विनवणि केली प्रेमवद्धांतरानीं ।
'त्यज न कधि अम्हां गे !' या परी नूपुरांनीं

कां आहे की नाही कमनीय कल्पना ?

भाषांतरकार केवढाहि विदग्ध व निपुण असला तरी भाषांतराची हातोटी वाटते तितकी सहज व सोपी नाही. कित्येकदा मूळ कृतींतलें मर्म कळूनहि केवळ दोन भाषांतील भिन्न भिन्न ठेवणींमुळे तें प्रतिकृतींत उतरवतां येत नाही. उदाहरणादाखल पुढील कांही स्थळांचें भाषांतर पहा. किष्किंधाकांडांत ऋष्यमूक पर्वताच्या आसपास सीतेच्या शोधांत विरही राम लक्ष्मणासमवेत हिंडत असतांना पावसाळ्याचा आरंभ होत आहे. या कांडांतील पावसाळ्याचीं व शरदाचीं चित्रमय व मार्मिक वर्णनें गुंसाईजींनी भागवताच्या दशमस्कंधांतील पूर्वार्धाच्या विसाव्या अध्यायांतून घेतलीं आहेत. राम लक्ष्मणास म्हणत आहेत;—

"घन घमंड नभ गरजत घोरा ।
प्रियाहीन डरपत मन मोरा
दामिनि दमक रहन घन माहीं ।
खलकै प्रीति जथा थिर नाहीं

या चौपाईंतील पहिल्या चरणांतील अनुप्रासांची बहार, दुसऱ्या चरणांतील 'डरपत' या शब्दांतील सूचक भाव, तिसऱ्या चरणांतील 'दमक' या अनुकरणवाचक शब्दांतील ध्वन्यर्थ व नाद आणि चवथ्या चरणांतील खलाच्या प्रीतीसंबंधींचा सार्वजनीन अनुभव या गोष्टी पुढील मराठी भाषांतरांत तें सुंदर असूनदेखील जशाच्या तशा आलेल्या नाहीत;—

"हा मेघ वर्षत नभीं घनघोर नादें
भीती प्रियाविरहता मम या मना दे ।
सौदामिनी चमकुनी घनि गुप्त होत
मैत्रीं जशी खलजनीं स्थिर ना रहात !

पावसाळ्याच्या याच वर्णनांत पुढे

"छुद्र नदी भरि चलि तोराई
जस थोरेहूँ धन खल इतराई"

अशी एक कल्पना आहे. हिच्यात दुसरा एक पाठभेद आहे. तो असा;—

"छुद्र नदी भरि, चलि, उतराई
जसे थोडे धन खल बौराई"

पावसाळ्यांत पर्वतावर मेघमाला ओसरतांच एखादी सुप्त नदी पाण्याने तुडुंब भरते, चालूं लागते आणि पर्वताच्या कड्यावरून खाली उतरते किंवा अशा कांही तोऱ्यांत चालूं लागते की जणू कांही एखाद्या दुष्टाला थोडेसें वैभव प्राप्त झालेलें असावें आणि तो गर्वानें फुगून जावा. बौराई म्हणजे बावचळून जाणें. 'भांबावला धनमदें भलतेंच बोलें' या रघुनाथ पंडितकृत दमयंती स्वयंवरांतील 'भांबावला' या शब्दाचा तोच अर्थ आहे. या उपर्युक्त चौपाईच्या

"क्षुद्रा नद्या भरुनि वाहति वारिपूरीं
थोड्याहि वैभवि वहे खळ गर्भभारीं ।

या मराठी भाषांतरांत मुळांतील शब्दचित्र हुबेहूब उमटलेलें नाही.

हिंदी प्रदेशांत प्रचलित असलेल्या कांहीं वाक्प्रचारांमागील संकेत आपल्या मराठी मुलुखांत परिचित नाहीत. त्यांवर अनुवादकांनी टिपा देणें युक्त व योग्य होतें असें माझें मत आहे. उदाहरण म्हणून पुढील संकेत बघा. राम वनास जाण्यास निघतात त्यापूर्वी कौसल्येची आज्ञा घेण्यास येतात. रामांची जन्मदात्रीच ती ! तिची स्थिति इकडे आड तिकडे विहीर अशी होते. कारण 'जा' म्हणावें तर पुत्रप्रेम आड येतें;

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

आणि 'जाऊं नको' म्हणावें तर पतिवचनाला बाधा येते. या वेळच्या तिच्या मन:स्थितीचें वर्णन करतांना गुंसाईजींनी पुढील संकेत योजला आहे:–

धरम सनेह उभयँ मति घेरी। भइ गति सांप छुछुंदरि केरि

याचें मराठी रूपांतर असे:–

चिचुंद्री–सर्पाची अशीच गति झाली जणु तिची
कळेना कैसें या गतिंतुनि निघावें अचुकचि ?

उत्तरेकडे एक संकेत असा आहे की साप आणि चिचुंद्री हे जर एकमेकांसमोर आले तर सापाची स्थिति मोठी चमत्कारिक होते. त्याने चिचुंद्री गिळली तर त्याला मरण येतें आणि त्याने तिला सोडून दिलें तर त्याला अंधत्व येतें.

सर्वसाधारण वाचकांच्या दृष्टीने अनुवादकांनी या अर्थाचें स्पष्टीकरण देणें आवश्यक होतें असें मला वाटतें.

धर्म, न्याय, राजकारण, समाजकारण आणि नित्यनैमित्तिक व्यवहार यांच्या नीति नियमांच्या विवेचनाच्या दृष्टीनेहि रामचरितमानस हा ग्रंथ अपूर्व व अलौकिक आहे. पुढील कांही उदाहरणें पाहा–

'कर्मेचि येत सुखदु:ख समग्रजीवा',
'जात्याच नीच ललनामन मूढ साचें',
'होणार, त्यापरिच चित्तभरे विकारें',
'काळें, जुने मित्रहि शत्रु होती',
'दु:संगतिस्तव विनाश न कोण पावे ?–
'चातुर्यहि खलमती कुठुनीं रहावें ?,
'कवि म्हणति खरें तें, लोकिं नारी स्वभाव–
'अकळचि न तयाचा कोणि जाणेल ठाव !'
'कीं स्नेह वाढवुनि मा फललाभ कांहीं',
'कळे न कोणा विधिहेतु झाकला',
'काल न लागे उशिर प्रयाणीं !
'माता, पिता, गुरू, धनी इतुक्या जनांचें–
'जो मानितो वचन सादर चित्त साचें–
'तेणेंचि धन्य जगतीं निज जन्म केला–
'नाही तरी जगिं निरर्थक तो जहाला इत्यादि.

नवीन दृष्टीने रामचरितमानसांत पुनरुच्चार व पाल्हाळ पुष्कळ आहे. परंतु गुंसाईजींच्या काळीं ग्रंथाचा सार्वत्रिक प्रसार नसल्यामुळे आणि ग्रंथकर्त्याची भूमिका उपदेशकाची असल्यामुळे एकादा विषय श्रोत्याच्या मनावर ठसावा म्हणून पुनरोक्ति व गोष्टीवेल्हाळपणा आवश्यक असे. अनुवाद मूळाचेंच प्रतिबिंब असल्यामुळें त्यांतहि हे दोष अपरिहार्य आहेत.

आजच्या स्वतंत्र भारताशी हिंदी ही राज्यभाषा आहे. तिच्यांतील सर्वोत्कृष्ट ग्रंथाचा हा अनुवाद करून डॉ. श्रीखंडे यांनी एक महान देशकार्य केलें आहे. गुंसाईजींचें मूळ रामचरितमानस आणि डॉक्टरांचा अनुवाद यांचा तौलनिक अभ्यास हिंदी मराठीच्या अभ्यासकांना हितकर व उपयुक्त होणारा आहे. अशा प्रकारच्या उच्चकोटीच्या ग्रंथाला विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांत स्थान मिळावें अशी माझी इच्छा आहे. हिंदी मराठी वाङ्मयावर डॉक्टर श्रीखंडे यांनी जे उपकार केले आहेत त्याबद्दल मी त्यांचें अंत:करणपूर्वक साभिवंदन अभिनंदन करतों.

भवानीशंकर श्री. पंडित

प्रा. भ. श्री. पंडितांची आधुनिक–मराठी–काव्य–समीक्षा

आधुनिक मराठी कविता *

आधुनिक मराठींतील अन्य वाङ्मयप्रकाराच्या मानाने काव्य हा वाङ्मयप्रकार जास्त भाग्यवान् म्हटला पाहिजे; कारण कथा, कादंबरी, निबंध, नाटक इत्यादि वाङ्मयप्रकारांवर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांपेक्षा आणि लेखांपेक्षा काव्यावर लिहिल्या गेलेल्या पुस्तकांची आणि लेखांची संख्या कितीतरी पटींनी जास्त आहे. काव्य हा विषय साहित्यविवेचकांचा विशेष आवडीचा असल्यामुळें असो वा सर्वसामान्य वाचकांना आधुनिक काव्य समजावून सांगण्याची आवश्यकता जास्त पटलेली असो– कोणत्याहि कारणामुळे कां होईना, आधुनिक मराठी काव्यावर समालोचनात्मक आणि समीक्षणात्मक लिखाण पुष्कळच लिहिल्या गेलें आहे आणि अजूनहि

* ('आधुनिक मराठी कविता' लेखक—प्रा. भ. श्री. पंडित प्रकाशक:—सुविचार प्रकाशन मंडळ, कि. रु. ५.)

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

लिहिलें जात आहे. तसें आहे म्हणूनच तर अगदी अलीकडे प्रा. रा. श्री. जोगांचा 'अर्वाचीन मराठी काव्य' हा ग्रंथ प्रसिद्ध झाला असतांना सुद्धा, प्रा. भ. श्री. पंडितांचा त्याच विषयावरचा 'आधुनिक मराठी कविता' या नांवाचा ग्रंथ नुकताच नवभारत ग्रंथमालेतर्फे प्रसिद्ध झाला आहे. आनंदाची गोष्ट ही की आधुनिक मराठी काव्याच्या अनेक वर्षांच्या व्यासंगामुळे प्रा. भ. श्री. पंडितांना त्याचें गुणदोषविवेचन करण्याचा विशेष अधिकार प्राप्त झालेला आहे. प्रा. पंडितांच्या सहवासांत ज्यांचा थोडा फार काळ गेला असेल त्यांना आधुनिक मराठी कविता त्यांच्या जिव्हाग्रींच नांदते आहे, असा अनुभव आला असेल. पुन्हा, कोण्या एका आंग्ल साहित्यकाराने म्हटलें आहे ना की कविच कवींचें हृद्गत जाणूं शकतो, कविच कवीच्या काव्यकृतीचें न्याय्य गुणग्रहण करूं शकतो ? त्या दृष्टीनेहि आधुनिक मराठी काव्याच्या परीक्षणाचा पंडितांचा अधिकार मोठा आहे; कारण ते स्वतः महाराष्ट्रांतले एक ख्यातनाम कवि आहेत. व्यासंग आणि सहृदयता या दोन्ही गुणांचा अशा रीतीने पंडितांच्या ठिकाणीं समन्वय झालेला असल्यामुळे, त्यांचा 'आधुनिक मराठी कविता' हा ग्रंथ जसा विपुल आणि अद्यावत् माहितीनें परिपूर्ण उतरलेला आहे तसाच तो मार्मिक रसास्वादानेंहि संपन्न झालेला आहे. पंडितांनी स्थूल आणि त्रोटक स्वरूपांत कां होईना पण आधुनिक मराठी कवितेची सामाजिक आणि राजकीय पार्श्वभूमि दिलेली असल्यामुळे, तिचें यथार्थ मूल्यमापन करण्यास पुष्कळच मदत झाली आहे. या पुस्तकाचा पूर्वार्धहि अत्यंत उपयुक्त झालेला आहे; कारण त्यांत विविध काव्यप्रकारांच्या तात्त्विक आणि तांत्रिक अंगांचें सुबोध आणि साधार विवेचन केलें आहे.

पंडितांच्या काव्यविवेचनांत दोष नाहीत असें नाही. क्वचित् त्यांतील विसंगति खटकते. आपल्या भाषेच्या परंपरेशीं विसदृश अशा तऱ्हेचे इंग्रजी वळणाचे शब्दप्रयोग आणि वाक्यप्रयोग केल्याबद्दल त्यांनी केशवसुतांना ठपका दिला आहे (पान १५३) आणि त्यांना स्वतःला मात्र अन्यत्र (पान २४३) "सौ. विमलाबाई देशपांड्यांना एके काळीं एक भावविवश कवयित्री होती" असें अस्सल इंग्रजी धर्तीचें वाक्य लिहिण्याचा मोह अनावर झालेला आहे ! पुन्हा पहिल्या पिढींतल्या कवींना लेबलें लावतांना त्यांनी फारशी सूक्ष्म दृष्टि दाखविली आहे असें वाटत नाही. रेंदाळकर हे चतुरस्त्र कवि कसे, हें नीट कळत नाही. तांब्यांना दिलेली 'भावकवि' ही पदवी अतिव्याप्त वाटते. हे किरकोळ दोष झाले. मला जाणवलेला मुख्य दोष निराळा आहे. या पुस्तकांत कालनिर्देशाचा अत्यंत अभाव आहे. कोणत्याच कवीच्या जीवनाची आणि त्याच्या काव्यलेखनाची कालमर्यादा दिलेली नाही. पुन्हा, कवीच्या व्यक्तित्वाचा आणि कवित्वाचा विकास अमुकच प्रकारें कां व कसा झाला हें जाणण्याच्या दृष्टीने त्याच्या चरित्रांतील निवडक घटनांचा, त्याच्यावर बालपणीं व तरुणपणीं झालेल्या संस्काराचा परिचय करून देणें आवश्यक वाटतें. प्रा. पंडितांनी ही आवश्यकता लक्षांत घेतलेली दिसत नाही. हे आणि असेच अन्य दोष असूनहि, पंडितांच्या पुस्तकानें आधुनिक मराठी कवितेच्या विकासाचा अद्यावत् परिचय करून देण्याची जी कामगिरी केली आहे तिच्या उपयुक्ततेला कोणत्याहि प्रकारें बाधा येत नाही. आधुनिक मराठी कवितेच्या प्रत्येक जिज्ञासू विद्यार्थ्यानें हें पुस्तक अवश्य अभ्यासावें इतकी त्याची निसंशय योग्यता आहे.

—अ. ना. देशपांडे

पाहुणे *

श्री. वसंत वरखेडकर यांची ही कादंबरी विचारप्रवर्तक आहे. लेखकाने आपल्या विचारदर्शनासाठी ललितसाहित्याचें प्रभावी माध्यम निवडलेलें आहे. परंतु लेखकाने कलेकडे काणाडोळा करूनच आपली ललितरचना केलेली आहे. कादंबरीला मनोरंजक कथानक नसल्यामुळे, रचनेच्या अनाकर्षक पद्धतीमुळे, क्वचित व्याख्यानवजा भाषणांमुळे आणि साधारण भाषाशैलीमुळे केवळ कलाविद् विवेचकांना ही कादंबरी आवडणार नाही, परंतु ज्यांना विचारगर्भ वाङ्मयाचें आकर्षण आहे अशा वाचकांना ही कादंबरी त्यांतील मौलिक

* ले. **वसंत वरखेडकर**. प्रकाशक—वीणा प्रकाशन, नागपूर. मूल्य ३ रुपये. पृष्ठसंख्या १७०.

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

विचारांमुळे खचित आवडेल. असें असलें तरी कर्त्यानें लालित्याकडे जरा अधिक लक्ष पुरविलें असतें तर त्याची ललितकृति मनोरंजक झाली असती आणि त्यानें प्रगट केलेल्या विचारांचें मूल्यहि वाढलें असतें. तसेंच कर्त्याची भाषा कमवलेली नसल्यामुळे ती त्याचे विचार व्यक्त करण्यास समर्थ ठरलेली नाही.

आधुनिकतेचे पंचप्राण असे अनंता, विनायक, सरोजिनी, वर्वे व कल्पना हीं पंचमहाभूतें (लेखकाच्या शब्दांत) खेडेगांवांतील देवराव पाटलांकडे 'पाहुणे' म्हणून पंधरा दिवस राहतात. या पंधरा दिवसांच्या त्यांच्या वास्तव्यांत त्यांना झालेलें पाटीलबोवांच्या व्यक्तिमत्वाचें दर्शन, त्यांचीं मतें, त्यांचा त्यांच्या मुलाशीं—राजरामाशीं झालेला वैचारिक संघर्ष, मालकी हक्कासंबंधींच्या त्यांच्या कल्पना, राजारामाच्या उथळ नवमताला त्यांनी केलेला दृढ विरोध, गांधीवादी आचार्य आणि शिष्य यांचा दांभिकपणा, खेडेगावांतील निरक्षरता व तज्जन्य अज्ञान, खेडेगांवांत शिरूं पहाणारे लहान उद्योगपति व सावकार, भांडवलवाल्यांचे गुलाम असलेले 'राष्ट्रसभावादी' कार्यकर्ते यांचें सुंदर दर्शन कादंबरीकारानें वायकांना घडविलेलें आहे. आणि वरील विषयांना धरूनच त्याने आपले विचार मांडलेले आहेत. कादंबरींतील प्रमुख व्यक्ति अनंता आहे. अनंताच्या मुखानें कर्त्यानें आपले विचार मांडलेले आहेत. या कादंबरीची रचना अगदी स्वतंत्र पद्धतीची आहे. या कादंबरींत अनंताचे स्वगत विचार आहेत; वर्वेचे चतुर औपरोधिक संवाद आहेत; कल्पना व राजाराम यांचीं चेष्टितें आहेत; विनायक व सरोजिनी यांचा कौटुंबिक वादसंवाद आहे; देवरावांचे गंभीर विचार आहेत; तसेंच आचार्यांची दांभिक वक्तव्यें आहेत आणि कल्पनेची व्याख्यानबाजी आहे. या सर्व मनोरंजक गुणस्थलांचें पृथक्करण थोड्याशा अवकाशांत शक्य नाही व त्यासाठी मार्मिक वाचकांस मूळ कादंबरी वाचणें इष्ट होईल. अनंताची कल्पनाशक्ति व निर्मळ विचार, वर्वेची बहरी टीकादृष्टि, राजारामाचा भावडेपणा, आचार्यांची दांभिकता, चांदमलजींचें गांधीवादी ढोंग, कोहळेगुरुजींची दासवृत्ति आणि कल्पनेची चंचल-वृत्ति यांचें लेखकानें सूक्ष्म वर्णन केलें आहे. कादंबरीची सुरवात जरी अनाकर्षक असली तरी पुढें प्रसंगचित्रण व पात्रांचें स्वभाव रेखाटन सुंदर साधलेलें आहे. कल्पनेची व्यक्तिरेखा व वर्वेचें स्वभावचित्र उत्कृष्ट वठलें आहे. आचार्यांचे संवाद सुरेख साधलेले आहेत. दोष दाखवावयाचा झालाच तर असें म्हणतां येईल की, कादंबरींतील पात्रांचे स्वभावधर्म लेखकानेच व्याख्यानरूपानें सांगितले आहेत. ते प्रसंगांतून दिग्दर्शित केले असते तर कादंबरीची रंजकता वाढली असती. तसेंच कथानकांत आलेलें ग्रामीण जीवन लेखकाला सूक्ष्मपणें वर्णन करतां आलें असतें व ग्रामजीवनांतील अनेक गोष्टींचें समर्पक वर्णन करतां आलें असतें. यामुळे कादंबरीच्या रसोत्कर्षांत भर पडली असती. कादंबरीकर्त्यानें प्रास्ताविकांत म्हटलें आहे की, प्रस्तुत कथेचा वास्तविकतेशीं मुळींच संबंध नाही. ती पूर्णपणें काल्पनिक आहे. परंतु तसें झालें नसून त्याच्या दृष्टि-पथांत आलेल्या व्यक्ति व प्रसंग यांचें सूक्ष्म वर्णन त्यानें आपल्या कादंबरींत केलें आहे. अर्थात् 'विगचित्रें' (लेखकाचा विनोदी शब्द वापरून म्हणावयाचें झालें तर) चितारण्याचा त्याचा हेतु नसला तरी कथानकाच्या ओघांत कांही प्रसंगांचें हुबेहुब वर्णन येऊन गेलेलें आहे. तसेंच या कादंबरींतील कांही पात्रें नागपूरकरांच्या खास परिचयाच्या कांही व्यक्तींची प्रतिबिंबें भासतील, परंतु यांत गर्हणीय असें कांहीच नाही. उलट जाणत्या वाचकांना त्या व्यक्तींची ओळख पटून कादंबरीकाराच्या चातुर्याचें कौतुक वाटेल. आचार्य व कल्पना यांचीं व्यक्तिचित्रें इतकीं उत्कृष्ट साधलेलीं आहेत कीं, त्यामुळे कादंबरीच्या गोडींत भर पडलेली आहे. आणखी कांही गुणस्थलें दाखविण्याचा आमचा मानस होता परंतु स्थलाभावीं तें शक्य नाही आणि म्हणून हें संक्षिप्त व अपुरें समीक्षण पुरें करतों.

—पां. ब. गाडगीळ

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

मुकुंदराजकृत 'विवेकसिंधु'

मुकुंदराजाचा 'विवेकसिंधु' हा वेदान्तपर ग्रंथ ज्ञानेश्वरी इतकाच प्रसिद्ध असून तो ज्ञानेश्वर पूर्व-कालीं रचला गेला असावा असा अनेकांचा समज आहे. हा ग्रंथ पूर्वी छापला गेला असला तरी त्यांतील पाठ अधिकृत मानतां येतील अशी स्थिति नव्हती. शिवाय ही छापील आवृत्तीहि अलीकडे फार दुर्मिळ झाली असल्यामुळे अभ्यासकांना ग्रंथ मिळण्याची शक्यता नसे. म्हणून भुसावळचे रा. गो. रा. गोगटे या साक्षेपी वृद्ध संशोधकांनी या ग्रंथाची ही 'अधिकृत' प्रत तयार करून प्रसिद्ध करविली आहे. प्रस्तुत प्रत तयार करण्या-पूर्वी संपादकांनी या ग्रंथाच्या सुमारें २७–२८ हस्त-लिखित प्रती वेगवेगळ्या संग्रहांतील पाहिल्या; त्यांची परस्पर तुलना केली व विषय व अर्थ यांच्या अनुसंधा-नाने योग्य वाटला तो तो पाठ भिन्न भिन्न प्रतींतून स्वीकारला. यासाठी १५७८ मधील प्रत त्यांनी मुख्य आधारभूत म्हणून मानली. त्याचप्रमाणे प्रत्येक ओळी-मधील कठीण शब्दाचा सविस्तर अर्थहि देऊन प्रत शक्यतों पूर्ण करण्याचा प्रयत्न केला आहे हें त्यांना भूषणास्पद आहे. आपल्या अभ्यासाचा मार्ग अशा रीतीने सुकर करून दिल्याबद्दल तरुण विध्यार्थांनी या वृद्ध संपादक संशोधकाचें ऋणी असलें पाहिजे.

या प्रतीस संपादकांनी जी प्रस्तावना जोडली आहे तींतील प्रथम भागांत भिन्न भिन्न हस्तलिखितां-तील फरक स्पष्ट करून या ग्रंथाची योग्यता काय हेंहि विवेचिलें आहे. द्वितीय भागांत मुकुंदराजाचे ग्रंथ, त्याच्या कालासंबंधी भिन्न भिन्न मतें व त्याबद्दल निघणारीं अनुमानें दिलीं आहेत. याशिवाय विवेक-सिंधूचा दासबोधादि ग्रंथांवर झालेला परिणाम सोदाह-रण विशद केला आहे. विवेकसिंधु व ज्ञानेश्वरी या दोन्ही ग्रंथांत जे समान शब्द सापडतात त्यांचीहि एक यादी यांत जोडली असल्यामुळे अभ्यासकांची विशेष सोय झाली आहे.

मुकुंदराजाच्या काळाचा विचार करतां रा. गोगटे यांनी जी विचारसरणी अनुसरली आहे त्यावरून मुकुं-दराज ज्ञानेश्वराच्या पूर्वीचे की नंतरचे या बाबतींत त्यांना संभ्रम निर्माण झाला असें दिसतें. एके ठिकाणीं ते मुकुंदराज ज्ञानेश्वरपूर्वकालीं होऊन गेले असें म्हणतात. तर

> 'ग्रंथांतरीं निरूपण ऐसें। जे अज्जड दुःख असे
> तयाचेनि निरासें। सच्चिदानन्द'
>
> (प्र. १७ ओ. २३ ५१८६)

या मुकुंदराजी ओवींतील 'ग्रंथांतरीं' म्हणजे 'ज्ञानेश्व-राच्या अमृतानुभवांत' असा अर्थ करून मुकुंदराज ज्ञानेश्वरोत्तर कालीं झाले असावे असें सूचित करतात. पण या सर्व बाबतींत त्यांची वृत्ति अत्यंत निराग्रही आहे ही संतोषाची गोष्ट आहे.

या चिकित्सक आवृत्तीचा फार मोठा विशेष म्हणजे, आपल्या प्रांतांतील एक अधिकारी विद्वान व बिहारचे भूतपूर्व राज्यपाल लोकनायक बापूजी अणे यांनी ग्रंथाला लिहिलेला पुरस्कार होय. हा पुरस्कार म्हणजे ना. अणे यांनी मुकुंदराजावर लिहिलेला एक लहानसा पण एका अर्थानें सर्वांगपरिपूर्ण असा प्रबंधच होय. या पुरस्कारांत मुकुंदराज हे ज्ञानेश्वर पूर्वकालीं होऊन गेले असें आपलें निःसंदिग्ध मत अणे यांनी प्रतिपादन केलें असून 'शके अकराशे दाहोत्तरे। साधा-रण नाम संवत्सरें' या ओवींतील शक संवत्सराची विसंगति दुसऱ्या एका विवेचनाच्या आधारें उलगडून दाखविली आहे. मुकुंदराजाची गुरुपरंपरा व तत्कालीन नृसिंह, बल्लाळ व जैतपाळ ही राजवंशावलि यासंबंधीहि अणे यांनी आपल्या विवेचनांतून पुष्कळच प्रकाश टाकला आहे.

सारांश, उत्कृष्ट पुरस्कार, व ग्रंथकर्त्याची सुंदर प्रस्तावना या दोन कर्णधार वाटाड्यांच्या मागोमाग या अगम्य विवेकसिंधूंत सामान्य विद्यार्थीप्रवाशाला बिनधोक संचार करतां येतो असें म्हणावयाला हरकत नाही. या सर्व विवेचनांतून एक गोष्ट सिद्ध होते ती अशी की ज्ञानेश्वर अगोदर होवोत की मुकुंदराज अगोदर होवोत; दोघांनीहि उपनिषदुक्त व आचार्य-प्रणीत वेदांतांतील अद्वैतमार्गाचें विवेचन केलें आहे. किंबहुना यानंतर होणाऱ्या सर्वच मराठी संतांची हीच परंपरा आहे. त्यामुळेच भिन्न भिन्न काळांत झालेल्या संतकवींच्या वचनांत साम्य दिसून येतें.

---

* (संपादक, गोपाळ रावजी गोगटे, वकील भुसावळ. प्रकाशक राजवाडे संशोधन मंडळ, धुळें; किं. रु. ५)

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

रा. गोगटे यांनी मान्य केलेल्या विवेकसिंधूच्या हस्तलिखित प्रतींतील शेवटच्या पानाचीं छायाचित्रेंहि पुस्तकांत दिलीं असल्यामुळे वाचकाला पूर्वकालाचें साक्षात दर्शन झाल्याप्रमाणे आनंद होतो.

प्रस्तुत चिकित्सक आवृत्तीचा परिचय करून देणें हा माझ्या लिहिण्याचा मुख्य उद्देश असल्यामुळे मुकुंद राजाच्या मूळ विवेचनाची चिकित्सा करणें किंवा त्याचा परामर्ष घेणें याचें मला प्रयोजन नाही. किंबहुना तसें करण्याची माझी योग्यताहि नाही. गुरुशिष्यसंबंध व गुरूची शिष्यावर झालेली कृपा इत्यादि विवेचन वेदान्ताच्या आधारें अतिशय सुबोध रीतीने मुकुंदराजांनी केलें तें मुळांतच वाचण्यासारखें आहे. साहित्यगुणांत ज्ञानेश्वरीचा किंवा अमृतानुभवाचा हात विवेकसिंधूहि धरूं शकत नसला तरी विवेचनांत कांही तो कमी नाही.

ग्रंथ वाचून एक विचार मनांत येतो की मुकुंदराज आंबेजोगाई येथील असोत नाहीतर अंभोरें येथील असोत, त्यांचें व्यक्तिमत्व सर्व मराठी भाषिकांइतकें व्यापक आहे. त्या अर्थाने ते सर्वांचे आहेत. स्थलाभिमानाने कांही संशोधकांचें संशोधन दूषित होण्याचा संभव असतो यासाठी हें लिहिलें आहे.

या अत्यंत अमोल ग्रंथाची छपाई मात्र व्हावी तशी सुबक झाली नाही. अशुद्धेंहि फार राहिल्यामुळें भलेंमोठें शुद्धिपत्र द्यावें लागलें. तथापि या शुद्धिपत्रासहि सर्व अशुद्धें आटोपलीं असें दिसत नाही. असो.

अशा या सन्मान्य प्राचीन ग्रंथाची चिकित्सक आवृत्ति तयार केल्याबद्दल संपादक गोगटे व प्रकाशक राजवाडे संशोधन मंडळ यांचें आम्ही अभिनंदन करतो.

—पां. कृ. सावळापूरकर

कुमारांचा सोबती*

कुमारवय उत्कर्ष मंडळाने पुरस्कृत केलेलें 'कुमारांचा सोबती' हें पुस्तक श्री. य. गो. नित्सुरे यांनी अत्यंत परिश्रमपूर्वक लिहिलें आहे. वेळींच योग्य मार्गदर्शन न मिळाल्यामुळे मनुष्याच्या भावी जीवनाचें फार नुकसान होतें. कुमारवय हें मानसिक व शारीरिक संक्रमणाचें वय असतें. या वयांत कुमाराला त्याच्या भावी जीवनाच्या यशाच्या दृष्टीने जितकें अचूक मार्गदर्शन व्हायला पाहिजे तितकें आपल्या देशांतील कुमाराला दुर्दैवाने होत नाही. ही फार मोठी अडचण 'कुमारांच्या सोबत्याने' बरीच दूर केली आहे.

प्रस्तुत पुस्तकाची मांडणी लेखकाने तीन भागांत केली आहे. पहिल्या भागांत आदर्श मनोभूमिका बनविण्याचें (१) स्वतःच्या जीवनदर्शेत पडलेला फरक समजून घेणें (२) कुमारवयाचें ध्येय कोणतें हें निश्चित करणें (३) कुमारांनी स्वतःच्या भोवतीं असणाऱ्या स्वदेशांतील व कुटुंबांतील परिस्थितींतील गुणदोष ठरविणें (४) गुरुजनांकडून मिळणाऱ्या मार्गदर्शनाबद्दल कृतज्ञ असणें (५) मानवाच्या अमर्याद कर्तृत्वावरील श्रद्धा वाढविणें हे पांच उपाय सांगून त्यांचें सविस्तर व सर्वांगीण विवेचन केलें आहे. या पुस्तकाचा दुसरा भाग अत्यंत महत्वाचा आहे. त्यांत, कुमारांनी आपला गुणविकास करणें म्हणजे काय करणें याचें अत्यंत सखोल व शक्यतों सर्वांगीण विवेचन केलें आहे. प्रत्येक कुमाराजवळ, पवित्र मनाची शक्ति; चांगल्या सवयींची शक्ति, सुदृढ शरीराची शक्ति; पुस्तकी ज्ञानाची शक्ति व विविध अनुभवांची शक्ति; अशा मनाच्या पांच मूलभूत शक्ति असतात. त्या सर्वांची पद्धतशीरपणें वाढ केल्यास कुमाराने आपल्या कुमार वयाचें गुणविकास हें ध्येय गाठलें असा त्याचा अर्थ होतो. या पंचावधानाचें अत्यंत काळजीपूर्वक विवेचन या दुसऱ्या भागांत केलें आहे. तिसऱ्या भागांत महत्वाच्या प्रश्नांची व समस्यांची चर्चा करून एकंदर विवेचनाला पूर्णता आणली आहे.

मराठी भाषेंत तरी कुमारवयांवरील मुलासाठी पायाशुद्ध पद्धतीने लिहिलेलीं पुस्तकें अतिशय कमी आहेत. प्रस्तुत पुस्तक शास्त्रीय स्वरूपाचें असलें तरी अनेक रंजक व बोधक दृष्टांत व सुभाषितें यांची जोड दिल्यामुळे तें सुगम झालें आहे. या पुस्तकाचें महत्त्व कुमारापुरतेंच मर्यादित नाही. कुमारांच्या जीवनाला सुबक आकार देण्याची जबाबदारी ज्या पालकांवर व शिक्षकांवर आहे, त्यांनाहि हें पुस्तक उपयुक्त वाटेल.

माधव गोपाळ जामदार

* **कुमारांचा सोबती—प्रकाशक—य. गो. नित्सुरे**; नित्सुरे-सदन कचरेवाडी प्रभात पत्र, पुणें ४.

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

एक पत्र

[श्रीयुत श्री. स. पेंढारकर हे 'रसायनशास्त्र' शिकविणारे एक अनुभविक व ख्यातनाम शिक्षक असून 'पारिभाषिक शब्दांसंबंधी'चें त्यांचें पत्र विचारप्रवर्तक असल्याने वाचकांना सादर करीत आहोंत.
—सं. युगवाणी].

संपादक 'युगवाणी' यांस

स. न. वि. वि. डॉक्टर रघुवीर यांच्या पारिभाषिक शब्दांविषयी माझे विचार 'युगवाणी'च्या वाचकांपुढे ठेवीत आहें. या प्रश्नाचें महत्त्व लक्षांत घेऊन, माझ्या पत्राला आपण 'युगवाणी'मध्ये जागा द्याल अशी आशा आहे.

आपला नम्र
श्री. स. पेंढारकर

नागपूर विश्वविद्यालयानें मातृभाषा हें महाविद्यालयांतील शिक्षणाचें माध्यम ठरविल्यानंतर विद्यार्थ्यांच्या उपयोगासाठी पुस्तकें व पारिभाषिक शब्दकोष तयार करण्याची जबाबदारी ओघानेंच विश्वविद्यालयावर येऊन पडली व त्या कामासाठी डाक्टर रघुवीर ह्या भाषापंडिताची योजना झाली. डाक्टर रघुवीरांनी त्यांच्यावर सोपविलेलें हें कार्य कांही प्राध्यापकांच्या साहाय्याने पार पाडलें व यावद्दल त्यांचें व त्या प्राध्यापकांचें अभिनंदन केलें पाहिजे. मात्र हें कार्य करतांना त्यांनी निरनिराळ्या विषयावर त्यापूर्वी झालेलीं पुस्तकें व त्यांत उपयोगांत आणलेले व अनेक वर्षें व्यवहारांत रूढ असलेले पारिभाषिक शब्द यांची दखल घेतली असती तर तयार केलेल्या पुस्तकांतील पारिभाषिक शब्दांपैकी अनेक शब्द इतके दुर्बोध व बोजड झाले नसतें व ह्या कारणामुळे शिक्षण मातृभाषेंतून घेण्यापेक्षा तें इंग्रजींतूनच घेणें जास्त वरें असें विद्यार्थ्यांना वाटूं लागलें नसतें. इंग्रजी शब्दासाठी रूढ असलेल्या मराठी सुटसुटीत शब्दांऐवजी डाक्टर रघुवीरांनी उपयोगांत आणलेल्या क्लिष्ट व बोजड शब्दांचीं कांही उदाहरणें पुढे देत आहें.

इंग्रजी शब्द	रूढ	रघुवीरीय शब्द
Liquid	द्रव	तरल
Pressure	दाब	निपीड
Projection	प्रक्षेप	विक्षेप
Focus	केंद्र	नाभि
Pendulum	आंदोलक	निदोल
Prism	विलोर	संक्षेत्र
Accurate	नक्की, अचूक	परिशुद्ध
Rate	दर	अर्घ
Dew	दंव	अवश्याय
Efficiency	कार्यक्षमता	कार्यनिष्पत्ति
Convex	बाह्यगोल	उदुब्ज
Concave	अंतर्गोल	न्युब्ज
Lens	भिंग	वीक्ष
Gravity	गुरुत्वाकर्षण	स्वाकृष्टि
Hollow	पोकळ	सुषिर
Gram	ग्रॅम	धान्य
Kilogram	किलोग्रॅम	सहस्रधान्य
Maximum	महत्तम	भूयिष्ठ
Minimum	लघुतम	अल्पिष्ठ
Volume	व्याप	परिमा
Microscope	सूक्ष्मदर्शक	अण्वीक्ष
Steam	वाफ	प्रवाष्प
Boiling Point	उत्कलन बिंदु	बुदबुदांक

वरील प्रकारच्या दुर्बोध व बोजड शब्दांमुळे पुस्तकांतील वाक्येच्या वाक्यें कशीं दुर्बोध झालीं आहेत

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

ह्याची कांहीं उदाहरणें खालीं देत आहें. पुस्तकांतील वाक्य प्रथम देऊन तें सोप्या भाषेंत कसें लिहितां आलें असतें तें त्या वाक्याखालीं कंसांत दाखविलें आहे.

१ रंभाची उंची परिशुद्धतेने मापावयाची आहे.
(दंडगोलाची उंची अचुक मापावयाची आहे.)

२ तरलांत एक लंबकोणीय अल्प परिमा असलेल्या संक्षेत्राकृतीची कल्पना करूं.
(द्रवांत लहान व्याप असलेल्या एका काटकोणीय विलोराकृतीची कल्पना करूं.)

३ तरलाचा बुदबुदांक आणि त्याचें भूयिष्ठ निपीड यांचा संबंध पुढील साध्या संपरीक्षेने सिद्ध करतां येतो.
(द्रवाचा उत्कलन बिंदु व त्यावरील महत्तम दाब यांचा संबंध पुढील साध्या प्रयोगाने सिद्ध करतां येतो.).

४ फार्टिनच्या वापीडमानाने वायुमंडळीय निपीडाचें परिशुद्ध वाचन घेणें सुकर होतें.
(फार्टिनच्या वायुभारमापकाने वातावरणाचा दाब अचुक मोजणें सोपें जातें.)

५ एक ग्राम्य प्रवाष्पाचें पाणी होतांना त्यांतून बाहेर पडणाऱ्या उष्मा राशीची परिशुद्ध अर्हा माहित असल्यास, पुढे वर्णन केलेल्या प्रवाष्प उष्णमानाच्या साहाय्याने वस्तूच्या आपेक्षिक उष्म्याचें निश्चयन करतां येतें.
(एक ग्रॅम वाफेचें पाणी होतांना त्यांतून बाहेर पडणाऱ्या उष्णतेची अचुक किंमत माहीत असल्यास पुढे वर्णन केलेल्या वाफेच्या उष्णतामापकाच्या साह्याने वस्तूची विशिष्ट उष्णता निश्चित करतां येते.)

शास्त्रीय विषयावरील लेखकांनी डाक्टर रघुवीरांनी तयार केलेलेच शब्द आपल्या पुस्तकांत उपयोगिले पाहिजेत असा आग्रह विश्वविद्यालयाने व शाळाखात्याने धरला तर चांगलीं पुस्तकें तयार होणार नाहीत. अमुकच शब्द वापरले पाहिजेत अशी जबरदस्ती लेखकावर न करतां त्याला नवीन शब्द तयार करण्याचें स्वातंत्र्य असावें व नवीन शब्द उपयोगांत आणतांना त्यांनी तो ज्या इंग्रजी शब्दासाठी उपयोजिला असेल तो इंग्रजी शब्द त्या नवीन मराठी किंवा हिंदी शब्दाजवळ कंसांत द्यावा म्हणजे वाचक असें पुस्तक वाचतांना गोंधळणार नाहीत. निरनिराळ्या व्यक्तींना आपले विचार व्यक्त करतांना निरनिराळे शब्द सुचतात व ते उपयोगांत आणले जातात. ह्यांपैकी जे शब्द सुलभ व सरस ठरतील ते टिकून राहतील आणि अशा रीतीने निरनिराळे सार्थ व सुटसुटीत पारिभाषिक शब्द तयार होऊन भाषासंपत्तींत भर पडेल.

युगवाणीचे वाचक या प्रश्नाचा विचार करतील अशी आशा आहे.

‘युगवाणी’च्या लेखकांस सूचना—

(१) लेख सुवाच्य अक्षरांत कागदाच्या एका बाजूने माया सोडून लिहावा.

(२) **कोणताहि लेख ‘युगवाणी’च्या सुमारें पांच पानांहून अधिक नसावा.**

(३) पुरेसें टपालहशील असल्याशिवाय अस्वीकृत लिखाण परत केलें जाणार नाही.

(४) लेखकांनी नवीन शुद्धलेखनाचे नियम पाळावेत.

(५) स्वीकृत लिखाण यथावकाश प्रसिद्ध होईल. ह्यासाठी लेखकांनी वृथा पत्रव्यवहाराचा त्रास घेऊं नये.

संपादक ‘युगवाणी’

अनुक्रमणिका
मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

संघ वार्ता

कार्यकारिणीची सभा

वि. सा. संघाच्या गोंदिया शाखेच्या कार्यकारिणीची सभा दि. ३१-५-५३ रोजीं शाखाध्यक्ष श्री. छोटुसाभाई यांच्या अध्यक्षतेखाली भरून खालील कामकाज झालें.

गोंदिया नगरपालिकेच्या बगीच्याची महिला समाजाजवळची रिकामी जागा विदर्भसाहित्य मंदिरासाठी मिळविण्याबद्दल खालील उपसमिति नियुक्त करण्यांत आली:—

अध्यक्ष : श्री. छोटुसाभाई
चिटणीस : श्री. ना. ग. डबीर
सभासद : श्री. केशवराव इंगळे
,, श्री. ना. ह. तेलंग

त्याचप्रमाणे त्या जागेसंबंधीचे अधिकृत कागद चिटणीसांनी जमविले असून कार्यास आरंभ झाला आहे. जागेसंबंधी मतैक्य झाल्यामुळे ही जागा लवकरच शाखेला मिळेल, असा प्रयत्न करण्यांत येत आहे.

गोंदिया येथे मराठी शाळांवर आक्रमण

गोंदिया नगरपालिकेमधील मराठी शाळांवर आक्रमण व मराठी शिक्षणाची आबाळ यासंबंधी दि. ५-५-५३ च्या 'तरुण भारतां'त आलेल्या लेखाच्या अनुषंगाने, यासंबंधी खरी हकीकत काय ती कळविण्याबाबत दुसऱ्या एका ठरावाने गोंदिया नगरपालिकेच्या अध्यक्षांना विनंतीपत्र पाठविण्यांत आलें आहे.

तसेंच गोंदियासंघ शाखेनेहि मराठीवर होणाऱ्या आक्रमणासंबंधी संपूर्ण माहिती गोळा करून अहवाल तयार करण्यासाठी खालील सभासदांची एक उपसमिति नेमली आहे.

उपसमितीचे सभासद : श्री. वि. म. लिमये
श्री. बा. मे. देशपांडे
श्री. ना. ग. डबीर

सभासद नोंदणीचें कार्य

वि. सा संघाच्या परीक्षासंबंधी गोंदियाशाखा जास्तींत जास्त प्रयत्न करीत आहे. त्याचप्रमाणे सभासद नोंदणीचें कार्यहि जोमाने सुरू आहे. या कामासाठी श्री. ना. ह. तेलंग, श्री. प्र. शं. तनखीवाले, श्री. वसंतराव दातीर, श्री. दि. अ. जोशी व श्री. ज. गो. बनसोड प्रभृति चिटणीसांना आपुलकीने सहकार्य देत असून आतापर्यंत सुमारे पाऊणशे सभासद नोंदविले आहेत.

ना. ग. डबीर
चिटणीस, वि. सा. संघ, गोंदियाशाखा

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ

भंडाराशाखा वृत्त

भंडारा जिल्ह्यांतील तुमसर येथे वि. सा. संघाचा विशेष प्रसार झालेला नसल्याचें आढळून आल्याने भंडाराशाखेचे चिटणीस श्री. वसंतराव शब्दे व केन्द्रीय कार्यकारिणीचे सभासद श्री. बाळासाहेब तिरपुडे यांनी दि. ७-६-५३ रोजीं तुमसरला जाऊन, तेथील कांही सद्‌गृहस्थांच्या भेटी घेतल्या व वि. सा. संघाच्या कार्याविषयी चर्चा केली. तसेंच त्या ठिकाणीं त्यांनी २० सभासदांची नोंदणी केली. भंडाराशाखा या विभागांत जातीने लक्ष घालून, प्रचार कार्य करीत आहे.

व. बा. शब्दे
चिटणीस, वि. सा. संघ, भंडाराशाखा

विदर्भ साहित्य संघ परीक्षा समिति

नवें केंद्र:—परीक्षा समीतीने पूर्वीं मान्य केलेल्या केंद्राखेरीज नवें केंद्र उघडावयाचें असल्यास कमीतकमी १५ परीक्षार्थी आवश्यक राहतील. सामान्यतः नवें केंद्र हें शिक्षण संस्थेंतच दिलें जाईल आणि तें त्या शिक्षण संस्थेच्या प्रमुख अधिकाऱ्यांच्या नेतृत्वाखालीच चालेल. नव्या केंद्राकरिता परीक्षासमितीने निर्धारित केलेलें आवेदनपत्र सामान्यतः जुलै १५ व डिसेंबर १५ पूर्वी संचालक–परीक्षा–समितीकडे शिक्षण संस्थेच्या प्रमुखांकडून येणें अपेक्षित आहे.

परीक्षा समय:—'साहित्य पारंगत' या सर्वोच्च परीक्षाखेरीज संस्थेच्या सर्व परीक्षा वर्षांतून दोनदा होतील. साधारणतः पूर्वार्धांतील परीक्षा ऑगष्टच्या व उत्तरार्धातील परीक्षा जानेवारीच्या दुसऱ्या किंवा तिसऱ्या शनिवारीं सुरू होतील. 'साहित्य पारंगत' ही परीक्षा वर्षांतून एकदाच व तीहि जानेवारींतच होईल. केवळ १९५३ यावर्षी ती ऑगस्टांत देखील होईल.

अध्ययन केंद्र व प्रमाणित अध्यापक वा प्रचारक:—परीक्षा केंद्राला प्रचार वा अध्यापनाचें साह्य करणाऱ्या संस्थांना परीक्षासमितीकडून अध्ययन केंद्र वा प्रचार केंद्र म्हणून तसेंच, अध्यापन वा प्रचार कार्य करणाऱ्या व्यक्तींना प्रमाणित अध्यापक वा प्रचारक म्हणून, परीक्षा समितीकडून मान्यतापत्रक मिळेल. हें मान्यतापत्रक हवें असणाऱ्यांनी आपल्या कार्याचें प्रमाण देऊन कार्यवाह–परीक्षा समितीकडे तद्विषयक आवेदनपत्र पाठवावें.

आवेदन पत्र व माहिती पत्रक:—आवेदनपत्रक व मांहितीपत्रक कार्यवाह–परीक्षा समितीकडें मागविल्यास केवळ डाकव्यय घेऊन आणि प्रश्नपत्रें संघ–कार्यालयाकडे मागविल्यास डाकव्यय अधिक प्रतिप्रश्नपत्र ८— प्रमाणे मूल्य घेऊन पाठविलें जातील.

सूचना—परीक्षा विषयक सर्व पत्रव्यवहार श्री. कार्यवाह–परीक्षासमिति वि सा. संघ, आणि मनी आर्डर, चेक इ० प्रकारचा सर्व आर्थिक व्यवहार श्री. सर चिटणीस–विदर्भ साहित्य संघ नागपूर या पत्त्यावर करावा.

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

अनुक्रमणिका

मराठीचा विकास: महाराष्ट्राचा विकास
राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
मकर संक्रांत, १९२३
विदर्भ साहित्य संघ

मध्यप्रदेश शाळाखात्याकडून वाचनाऱ्यांसाठी मंजुरी मिळालेलें
विदर्भ साहित्य संघाचें मुखपत्र

युगवाणी

मासिक, जुलै १९५३

वार्षिक वर्गणी पांच रुपये :: सभासदांना विनामूल्य :: सभासदत्वाचें वार्षिक शुल्क फक्त तीन रुपये

विदर्भ साहित्य संघाच्या आजच्या गरजा

१. विदर्भ मंदिराच्या इमारतीची सांगता करणें.

२. वि. सा. संघाच्या परीक्षांना व्यापक आणि सर्वोपयोगी स्वरूप देणें.

३. वि. सा. सं. चें मुखपत्र **युगवाणी** आर्थिक दृष्टीने स्वावलंबी करून उत्तरोत्तर त्याचें स्वरूप सर्वांगीण करणें.

४. वि. सा. सं.च्या वतीने उत्कृष्ट, दुर्मिळ आणि शैक्षणिक ग्रंथांच्या प्रकाशनाचें कार्य जोमाने सुरू करणें.

५. वि. सा. संघाला मराठी भाषेच्या हिताचें कार्य प्रातिनिधिक स्वरूपाने अधिक धडाडीने करतां येण्यासाठी संघाचे सभासद वाढविणें.

या सर्वांसाठी संघाचे सभासद आणि कार्यकारी मंडळ अविश्रांत मेहनत करीत आहेत. मराठी-प्रेमी जनतेने तनमनधनाने मदत करण्यास प्रवृत्त व्हावें म्हणून संघाचें कार्य नेटाने चालविण्याच्या संकल्पांत मराठीच्या नागरिकांनी हातभार लावावा अशी नम्र विनंती आहे.

विदर्भ साहित्य संघाची मराठी वाङ्मयाच्या सेवेसाठी शक्ति वाढवा आणि जास्तींत जास्त संख्येनें वि. सा. संघाला सभासद मिळवून द्या.

मुद्रक पां ना. [illegible], [illegible] मुद्रणालय, [illegible], नागपूर.

अनुक्रमणिका

राज्य मराठी विकास संस्थेद्वारे संगणकीकृत
विदर्भ साहित्य संघ